# मेहता मराठी ग्रंथजगत

सप्टेंबर, २०२५
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष पंचविसावे
अंक नववा



## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२५ मध्ये केली जाईल. १२ जानेवारी, २०२६ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦सप्टेंबर २०२५ ♦वर्ष पंचविसावे ♦अंक नववा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस

## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **विशेष** | ९ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द हिडन हिंदू | १४ |
| द स्टोरीज वी टेल | २२ |
| खुलभर दुधाची कहाणी | २८ |
| महाराणी बायजाबाई शिंदे | ३४ |
| चांदणफुला | ४२ |
| **अभिप्राय** | ५८ |
| **दिनविशेष** | ६२ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

# संपादकीय

## अनुवादाचा मागोवा!

दरवर्षी सप्टेंबर महिन्यातील ३० तारखेला 'जागतिक अनुवाद दिवस' साजरा केला जातो. बायबलचे अनुवादक व अनुवादाचे जनक म्हणून सेन्ट जे रॉम यांना ओळखले जाते. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९५३साली स्थापन झालेल्या 'इन्टरनॅशनल फेडरेशन फॉर ट्रान्सलेटर्स' पासून 'जागतिक अनुवाद दिवस' साजरा केला जाऊ लागला.

जगभरातील विविध भाषांमधील साहित्याचा अनुवादाच्या माध्यमातून आपल्या मातृभाषेत आस्वाद घेता येतो. ही एक मोठी सोय अनुवादामुळे झाली आहे. अभिजात जागतिक साहित्यातील जी प्रसिद्ध पुस्तके अथवा लेखक, कवी आहेत, यांचे साहित्य या निमित्ताने जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचते, ही मोठी जमेची बाजू आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि अनुवादित साहित्य हे समीकरणदेखील फार पूर्वीपासूनच आहे. 'टी-बुक क्लब' या योजनेअंतर्गत जागतिक स्तरावरील बेस्ट सेलर पुस्तके मराठीत वाचकासाठी उपलब्ध करून दिली आहेत. 'जेफ्री आर्चर', 'जॉन ग्रिशॅम', 'फ्रेडरिक

२ ५

फोरसाइथ', 'रॉबिन कुक', 'ॲलिस्टर मॅकलिन' इत्यादी लेखकांची पुस्तके मराठीत वाचकप्रिय आहेत.

परकीय भाषा, प्रादेशिक भाषा यांमधील साहित्य मूळभाषेत प्रत्येकालाच वाचता येणे शक्य नसते. यावरील पर्याय म्हणून अनुवादित साहित्याकडे पाहिले जाते. अनुवादित पुस्तकांमुळे अभिजात साहित्यातील वाङ्मय सहज वाचकांपर्यंत पोहोचते. अनुवादाच्या निमित्ताने विविध भाषा आणि मातृभाषा या दोहोंमधील संवादाचा पूल बांधला गेलेला पाहायला मिळतो. अनुवाद हे एक शास्त्र असून त्याद्वारे साहित्याची देवाण-घेवाण व आदानप्रदान होत असते.

अमेरिकन क्लासिक्समधील बहुतांश पुस्तके मधल्या काळात अनुपलब्ध होती. त्यामधील बरीचशी पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने पुनर्प्रकाशित केली. सुनील मेहता यांचा हा अनुवादाबाबतचा महत्त्वाकांक्षी असा प्रकल्प होता. तो त्यांनी पूर्ण केला. अमेरिकन क्लासिक्समधील शांता शेळके यांनी अनुवादित केलेली 'चौघीजणी', 'गवती समुद्र' ही पुस्तके, 'शापित वास्तू' हे शंकर पाटील अनुवादित पुस्तक ही पुस्तके आमच्या ग्रंथसूचीत होतीच. त्याव्यतिरिक्त असणारी जवळपास पंधरा पुस्तके कालांतराने मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली व ही पुस्तके आजही वाचकांसाठी उपलब्ध आहेत. या पुस्तकांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो. याचा अनुभव वारंवार येत असतो.

'अनुवाद' ही एक कला आहे. परभाषेतील साहित्य आपल्या व्यवहार भाषेत अथवा मातृभाषेत अनुवाद करून आणणे, हेही कौशल्याचे काम आहे. अनुवादाच्या माध्यमातून संवादाचा पूल उभारला जातो. त्यातून चांगले प्रसिद्ध साहित्य वाचकांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर होतो. अनुवादाच्या क्षेत्रात काही करू पाहणाऱ्या तरुण अनुवादकांसाठी हॅन्डबुक ठरेल अशा प्रकारचे एक पुस्तक आमच्या ग्रंथसूचीत आहे. 'अनुवादातून अनुसर्जनाकडे' हे लीना सोहोनी लिखित आत्मकथन. आजवर ६५हून अधिक अनुवादित पुस्तके त्यांच्या नावावर जमा असून, लवकरच त्या पुस्तकांची आकडेवारी शंभरचा आकडा पार करेल, याबाबत शंका नाही. या पुस्तकालाही वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

सुनील मेहता सर 'फ्रँकफुर्ट बुक फेअर', 'दिल्ली बुक फेअर' अशा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील बुक फेअर्सना हजेरी लावत असत. त्या प्रदर्शनांतून इतर भाषांतील गाजणारी पुस्तके मराठीत आणण्याचे काम सरांनी केले. त्या पुस्तकांचे हक्क मिळवणे, पुस्तकाचा उत्तम अनुवाद करून घेऊन त्या पुस्तकांवर मुद्रितशोधन, संपादकीय संस्कार इत्यादी सोपस्कार करून उत्तम आणि उच्च निर्मितिमूल्य असणारे पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचवणे हे काम अव्याहतपणे सरांनी केले. त्याच पावलावर पाऊल ठेवत आम्ही पुस्तकनिर्मिती, प्रकाशन यांवर लक्ष देऊन काम करत आहोत. हे काम असेच निरंतर चालत राहील, हे इथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

आमच्या सर्व वाचकांना 'जागतिक अनुवाद दिना'च्या हार्दिक शुभेच्छा!

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील ‘क्लासिक्स’साठी खास सवलत!
₹ १०० भरून ‘टी बुक क्लब’ यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून ‘टी बुक क्लब’चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
‘टी बुक क्लब’ ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली,
वाचायला सोपी,
सोयीस्कर
– थेट तुमच्या
कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि
अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
स्वामी
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# विशेष

## ग्रामीण साहित्याच्या पाटलांची जन्मशताब्दी....

मराठी भाषेचं साहित्यविश्व इतर भाषांच्या तुलनेत इतकं समृद्ध का आहे? या प्रश्नाचं अवलोकन केल्यावर मराठी भाषेचं एक वैशिष्ट्य लक्षात येईल. ते म्हणजे, मराठी साहित्याने नव्या साहित्यप्रकारांचा सहजपणे स्वीकार केला. मराठी भाषेची समृद्ध साहित्यसरिता जशी पुढे येत राहिली, तशी नव्या विचारांचा ती स्वीकार करत राहिली आणि अधिक समृद्ध होत गेली. 'इये मराठीचिये नगरी । ब्रम्हविद्येचा सुकाळु करी । देणेघेणे सुखचिवरी । होऊ देई या जगा।।' श्रीमाऊलींनी ज्ञानदेवीत प्रार्थना केल्याप्रमाणे या भाषेत देण्या-घेण्याचा विचार सहजपणे होत राहिला. महानुभावांसह वारकरी संतांनी या भाषेत अमाप साहित्य रचले आणि वारकरी पंथाची जणू धर्मभाषाच मराठी झाली. नव्हे-नव्हे; 'संस्कृत भाषा जशी देववाणी, तशी मराठी ही संतवाणी' असं म्हटलं, तर अतिशय योग्य होईल. मराठीच्या या सुकाळु नगरीत श्रीसंतांनी अभंग रचले आणि गावोगावी टाळ-मृदुंग गर्जू लागले, या भाषेत श्लोक म्हटले, आर्या गायल्या, पोवाड्यांनी डफावर थाप टाकली, लावण्यांनी पायात




चाळ बांधले, अंगाईने पाळणे झुलू लागले, काव्याच्या वेलीला बहर आला, निबंध लिहिले, अग्रलेखांनी स्वातंत्र्याची चळवळ उभी केली, कथा स्फुरल्या, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या, दलित साहित्य रुजले, ललित लिहिले गेले, अशा कित्येक साहित्यछटा या भाषेत दिसून येतात. या सर्वांबरोबरच मराठी मनाचा रांगडा स्थायीभाव म्हणजे, ग्रामीण साहित्य! मराठी रसिकांनी ग्रामीण साहित्यावर मनमुराद प्रेम केले. इथला माणूस गावाकडच्या गोष्टी आवडीने ऐकतो, गावच्या मातीत पुरलेली त्याची नाळ त्याला सतत गावाची साद घालत राहिली आणि या सादेला शब्द दिले ते शंकर पाटलांनी!

ग्रामीण साहित्य समृद्ध करणाऱ्या लेखकांपैकी महत्त्वाचं एक नाव म्हणजे शंकर पाटील. ८ ऑगस्टपासून शंकर पाटील यांचं जन्मशताब्दी वर्षं चालू होत आहे. त्यांनी केलेल्या साहित्यसेवेचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्याचं हे वर्ष आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या पट्टणकोडोली गावात जन्मलेल्या या लेखकाने गाव पकडला तो कायमचाच! आपल्या गावची तांबडी माती आणि पंचगंगा नदी त्यांना साद घालत राहिली आणि ग्रामजीवनातील प्रत्येक छटा शंकर पाटलांनी नेमकेपणाने टिपली. गावचा पाटील, गावचा बामण, इथपासून अलुतेदार-बलुतेदार, गावातील माणसांचे चालणे-बोलणे, त्यांची शेतीभाती, त्यांचा व्यवहार, त्यांची रीतभात यांना शंकर पाटलांनी शब्दांत मांडले आणि बांधावर राबणाऱ्या बायाबापड्यांचे कष्ट, झोपडीच्या सावलीत बसलेला म्हातारा, खुंटीला बांधलेलं जनावर, पारावरच्या गप्पा शंकर पाटील लिखाणातून उतरवू लागले, कथाकथनांतून सांगू लागले; तर कधी चित्रपटातून दाखवू लागले.

शंकर पाटलांनी ग्रामीण जीवन विपुल प्रमाणात मांडलं, ते कथांमधून. 'वळीव, 'भेटीगाठी', 'आभाळ', 'पाटलांची चंची' इत्यादींसारखे तब्बल १६ कथासंग्रह, 'टारफुला' कादंबरी, 'गल्ली ते दिल्ली', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' ही वगनाट्यं, अनेक चित्रपटांच्या कथा, संवादलेखन इतकं मोठं साहित्यविश्व त्यांनी निर्माण केलं. आपल्या खट्याळ, मिश्कील विनोदाने शंकर पाटलांनी ग्रामजीवन रंगवलं. खेड्यातील माणसं, त्यांचे परस्पर-संबंध, त्यांच्या व्यथा, त्यांची लकब, खेड्याचं मन, त्याचे हुंकार या लेखकाने जाणले आणि कथेतून त्याला जिवंतपणा

आणला. 'जोडणी' कथेतला शिवा आपला जेव्हा आपल्या वाटेकऱ्याच्या बायकोवर हात टाकतो, तेव्हा शिवाची झालेली घालमेल, त्यानं साधून फसलेला डाव, त्याला झालेला पश्चात्ताप, एका व्यक्तीच्या स्वभावातील एवढे सारे पदर एका लघुकथेत रंजकपणे रंगवून वाचकाची पुढील प्रसंगाची उत्कंठा शिगेला पोहोचवणारे शंकर पाटीलच! 'टाकीचे घाव' कथेतील शिकवणुकीच्या बहाण्याने विद्यार्थ्यांना राबवून घेणारे ढगे मास्तर, 'भान' कथेतील खून करून आलेले दादा आणि बाळू, 'नेमानेमी'मधील बाळा परीट आणि त्याची ओढ्याला वारंवार वाहून जाणारी बायको, 'नाटक' कथेतील नाटकाची उडलेली तारांबळ अशा शेकडो कथांमधून शंकर पाटलांनी गावखेड्याचे विश्वरूपदर्शनच घडवले आहे.



शंकर पाटलांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी कथांमधून ग्रामजीवन रंगवले, तसे चित्रपटांमधून ते प्रत्यक्ष दाखवले. 'वावटळ' कथेची पटकथा लिहून त्यांनी चित्रपट क्षेत्रात पाऊल ठेवले. 'एक गाव बारा भानगडी', ' गणगौळण', 'युगे युगे मी वाट पाहिली', 'पाहुणी', 'पिंजरा', 'भुजंग', 'भोळीभाबडी', 'असला नवरा नको गं बाई!' इत्यादी चित्रपटांच्या कथा, पटकथा, संवादलेखन त्यांनी केले. 'एक गाव बारा भानगडी'मधील इश्टेटीच्या हव्यासापोटी बहिणीचा जीव घेणारा, गावच्या सोसायटीत घोटाळा करणारा सरपंच, आणि त्याचे झोल्या अण्णा, गाढवे अण्णा, झगडे अण्णा हे साथीदार, या सर्व पात्रांमधून त्यांनी प्रत्येक गावात चालणारं राजकारण, प्रस्थापित पुढारी, त्यांच्या कुरापती यांचं वास्तव्य दर्शन घडवलं आहे. ५० वर्षांनंतरही आठवणाऱ्या आणि मराठी समाजजीवनात व चित्रपटसृष्टीत आदर्श वस्तुपाठ घालून देणाऱ्या 'पिंजरा' चित्रपटाचे संवाद शंकर पाटील यांनी लिहीलेले आहेत. ग्रामीण जीवन दाखवता-दाखवता त्या चित्रपटात दाखवलेले नीतीचे धडे यातून शंकर पाटील यांची गावात रमण्याबरोबरच गावाविषयी असलेली तत्त्वभुमिका दिसून येते. शंकर पाटलांच्या साहित्याची

अशी कित्येक वैशिष्ट्यं आपल्याला त्यांच्या लेखनातून, कलाकृतीतून, कथाकथनातून दिसून येतात.


तत्कालीन काळात जी-जी माध्यमं उपलब्ध होती, त्या सर्व क्षेत्रांत उतरून शंकर पाटलांनी साहित्य फुलवलं. कथा, कादंबरी, चित्रपट यांबरोबरच रेडिओवरून शंकर पाटील यांचं कथाकथन खूप गाजलं. स्वतः लिहिलेल्या कथेला शंकर पाटलांचा मातृस्वर लाभल्याने त्या कथाकथनाला काही विशेष असा गोडवा आहे. आजही त्यांच्या आवाजातील कथाकथन आपल्याला यु-ट्यूबवर ऐकायला उपलब्ध आहेत.


मराठी साहित्यात भरीव योगदान देणाऱ्या शंकर पाटील यांनी १९८५साली नांदेड येथे पार पडलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचं अध्यक्षपद भूषवलं. कधीकाळी संथ आणि शांत चालणारं गाव आता बदलू लागलं आहे. काहींना शहराच्या वेशींनी गिळून टाकलं, काहींना शहरातील झगमगाट खुणावू लागला आणि गावं ओस पडली, कालचं गाव आज राहिलं नाही. आजचं गावपण उद्या राहणार नाही; पण शंकर पाटलांसारख्या साहित्यिकांनी गावाकडच्या मातीचा सुवास अत्तरासारखा साठवून ठेवला. सिमेंटच्या जंगलात त्या अत्तरकुप्या महाराष्ट्राने जपून ठेवल्या पाहिजेत; कारण तोच महाराष्ट्राचा सुवास आहे, महाराष्ट्राचा सूर आहे.


(सौजन्य : दै. तरुण भारत, कोल्हापूर)

- **धैर्यशील लाड-कुंडलकर**


◆



# शंकर पाटील यांचे साहित्य




जुगलबंदी

इल्लम

वावरी शेंग

टारफुला

पाटलांची चंची

फक्कड गोष्टी

घालमेल

आभाळ




भेटीगाठी

वळीव

गारवेल

बंधारा




श्रीगणेशा

खुळ्याची चावडी


शापित वास्तू

कथा अकलेच्या कांद्याची

धिंड

खुश खरेदी

# पुस्तकाच्या पानांतून




## द हिडन हिंदू

**अक्षत गुप्ता**

अनुवाद

**मुक्ता देशपांडे**

पृष्ठे : २६४

किंमत : ३००

*देशभरातील वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या, अल्पावधीत बेस्ट सेलर ठरलेल्या 'द हिडन हिंदू' मालिकेचा तिसरा भाग आता मराठीत*

### मी कोण आहे

डॉ. बत्रांना एकाकी अवस्थेत आलेला मृत्यू, त्यांचा दुर्लक्षित संघर्ष आणि कोणतीही दयामाया न दाखवता, कोणत्याही अंत्यसंस्कारांशिवाय पाणबुडीतून निर्दयी सागरात, त्यांना कसं फेकून देण्यात आलं, याची दु:खद कहाणी ऐकून मिसेस बत्रा मुळापासून हादरून गेल्या,

त्यांना अपरिमित दु:ख झालं आणि ते साहजिकच होतं. आपल्या पतीला पुन्हा भेटता येईल या आशेचा धागा त्यांनी जिवापाड धरून ठेवला होता; पण आता तर तोही तुटला होता. त्या भयाण वास्तवाच्या जाणिवेनं पुरत्या उद्ध्वस्त झालेल्या मिसेस बत्रा दाराकडे चालत गेल्या, त्यांनी दार उघडलं आणि पृथ्वीला तिथून निघून जायला सांगितलं. पृथ्वी त्यांचं दु:ख समजू शकत होता आणि त्यांचा तीव्र शोक शांतवण्यासाठी तो असमर्थ होता हे त्याला माहीत होतं. तो मुकाट्यानं बाहेर जायला निघाला.

''तुमच्या प्रिय पतीला मारणाऱ्या लोकांचं पुढे काय झालं आणि त्यांना का मारण्यात आलं हे तुम्हाला जाणून नाही घ्यायचं?'' बाहेर पाऊल ठेवण्यापूर्वी पृथ्वीनं विचारलं.

पृथ्वीकडे बघत मिसेस बत्रा क्षणभर शांत उभ्या राहिल्या. त्यांनी दार पुन्हा लावून घेतलं आणि पृथ्वी परत आपल्या जागेवर येऊन बसला. आपल्या मनीची इच्छा त्यांनी जाणली, म्हणून मग ती संपूर्ण कहाणी शेवटपर्यंत ऐकण्यासाठी त्या कोचावर येऊन बसल्या. डॉ. बत्रांच्या मारेकऱ्यांविषयी त्यांना अधिक जाणून घ्यायची इच्छा आहे हे हेरून पृथ्वीनं मागील पानावरून कथेचा धागा पुन्हा पकडून बोलायला सुरुवात केली.

ज्येष्ठ (मे) महिन्यात, जेव्हा कोविड-१९मुळे संपूर्ण जग एका जागी थिजलं होतं आणि मृतांची संख्या झपाट्यानं वाढत होती, तेव्हा जाणाऱ्या बळींच्या कहाण्या सगळ्या समाजमाध्यमांवर, वृत्तपत्रांमध्ये आणि वाहिन्यांच्या बातमीपत्रांमध्ये झळकत होत्या. अनिश्चिततेच्या काळ्याकुट्ट ढगांनी माणसांची आयुष्यं अशीकाही झाकोळून टाकली होती की, आशा हळूहळू मावळत चालली होती. कोविड-१९ नं घेतलेल्या बळींची संख्या एकीकडे सगळे अंदाज खोटे ठरवत वाढत चालली होती, तेव्हा अन्य अनर्थकारी घटनाही बातम्यांमध्ये ठळकपणे समोर यायला लागल्या होत्या : राक्षसतालनं गिळंकृत केलेलं अद्भुत आणि शांत मानसरोवर; सांगाड्यांचं सरोवर असलेल्या रूपकुंडाचा झालेला विध्वंस; जगातल्या सात आश्चर्यांपैकी असलेला ताज महाल अचानक काळाठिक्कर पडल्याची घटना; भुतांचं गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुलधाराला एका रात्रीत पडलेला वेढा. 'कोरोनानं मांडलेल्या हाहाकारात भारतात सर्वत्र घडत

असलेल्या रहस्यमय घटनांची भर ही जगबुडी जवळ येऊन ठेपल्याची चाहूल तर नव्हे?' अशा प्रकारच्या बातम्यांनी त्या अविश्वसनीय घटना म्हणजे घातपाताच्या योजना असल्याच्या चर्चांना अधिकच पुष्टी मिळाली.

अंगावरच्या जखमा अजून भरत असलेल्या अवस्थेतील चिंताक्रांत अश्वत्थामा वैâलास पर्वतावरच्या ग्यानगंजमध्ये बसला होता. ओमच्या अवचेतन मनात कैद झालेल्या परशुरामांच्या आणि कृपाचार्यांच्या निश्चल शरीरांकडे त्यानं बघितलं. त्यांच्या शेजारी, कुलधाराच्या संघर्षानंतर बेशुद्ध झालेला ओम पडला होता. अश्वत्थाम्यानं वृषकपीबद्दल वेद व्यासांना विचारलं, तेव्हा त्याला आणखी एक दु:खद उत्तर मिळालं.

''वृषकपि मृत्युशय्येवर आहे. आणखी काही तास फारतर तो या जीवन-मरणाच्या लढाईत टिकाव धरू शकेल.''

''काय करावं ते मला कळत नाहीये. वृषकपि मरणपंथाला लागलाय आणि मिलारेपा कधीच निघून गेलाय, म्हणजे आपण हरलो आहोत का? की नागेंद्रही मेला आहे म्हणजे आपण जिंकलो आहोत, हे मला समजत नाहीये. नक्की मला काय वाटायला हवं आहे हेच मला कळत नाही,'' आपल्याच विचारांमध्ये बुडून गेलेला अश्वत्थामा म्हणाला.

वेद व्यास काहीतरी बोलणार, तेवढ्यात आश्चर्य घडलं, म्हणजे कृपाचार्य आणि अश्वत्थामा त्यांच्या सूक्ष्म रूपांतून परतून पुन्हा आपापल्या शरीरांमध्ये प्रवेश करते झाले आणि अगदी नेहमीसारखे उठून उभे राहिले. त्यांच्या स्वागताला अश्वत्थामा त्याच्या जागेवरून उठून पुढे आला.

''तुम्ही परत आलात! ते दार तुम्ही कसं उघडलंत?''

''आम्हाला ते उघडावंच लागलं नाही. ओमच्या आत अचानकपणे काहीतरी बदल झाला आणि त्यानंतर कोणताच प्रतिकार झाला नाही, आम्हाला पकडण्याचा प्रयत्न झाला नाही आणि आम्हाला रोखण्यासाठी दारही शिल्लक राहिलं नाही.'' हे का आणि कसं झालं यावर अजूनही विचार करत असलेल्या परशुरामांनी उत्तर दिलं.

गोंधळलेल्या अश्वत्थाम्यानं मनातला विचार मोठ्यानं बोलून दाखवला, ''पण हे असं घडूच कसं शकलं? ते दार गेलं कुठे?''

''मी ते नष्ट केलं!'' त्यांच्या मागून आवाज आला. अश्वत्थामा

आश्चर्यानं मागे वळला, अर्थात तो आवाज त्यानं लगेच ओळखला होता. तो ओम होता. तोही उठून बसला होता आणि त्याची नजर कुठेतरी लांबवर खिळली होती. ''ते दार गेलं; कारण माझ्यामध्ये आणि माझ्या लपलेल्या भूतकाळामध्ये कोणताही अडथळा नाही, पूल नाही आणि दारही नाही. तो कधीच नसणार. आता मला माहीत आहे की मी कोण आहे.'' त्या चौघांकडेही कटाक्ष टाकत ओम म्हणाला.

''कोण आहेस तू?'' कृपाचार्यांनी विचारलं.

प्रत्येकाची उत्सुक नजर ओमवर खिळली होती.

ओमनं डोळे मिटले आणि एक खोल श्वास घेत तो म्हणाला, ''मी देवध्वज आहे.''

''पण असं असू शकत नाही! आम्ही नीट बघितलं, तुला तशी जन्मखूण नाही! हे शक्य तरी कसं असू शकतं?'' या नवीन साक्षात्काराबद्दलच्या एकेक माहितीचा तुकडा जोडण्याचा प्रयत्न करत कृपाचार्य म्हणाले.

''जरा थांब! मला काही कळत नाहीये. ओमच्या स्मृतींमध्ये चिरंजीवांना देवध्वजाच्या शरीरावर जी जन्मखूण दिसली होती, ती नागेंद्रच्या पायावर होती आणि ओम स्वत:च देवध्वज असल्याचा दावा करतोय. मग त्या दोघांमधला खरा देवध्वज कोणता?'' पुरत्या गोंधळलेल्या मिसेस बत्रांनी पृथ्वीला विचारलं.

पृथ्वी उत्तरला, ''दोघंही.''

''म्हणजे ती दोघं जुळी आहेत असं तुला म्हणायचंय का?'' मिसेस बत्रांनी विचारलं.

''नाही, ती जुळी नाहीत. ती दोघं एकच व्यक्ती आहेत.''

''द्विविध / विभाजित व्यक्तिमत्त्वं?''

''नाही. तसंही नाही.''

''पृथ्वी, तुझ्या बोलण्याला काहीच अर्थ नाही. दोन माणसं एकच व्यक्ती कशी असू शकतील? हे माझ्या समजण्यापलीकडचं आहे.'' मिसेस बत्रांनी अविश्वासानं हात वर केले.

'कैलास पर्वतावरच्या चिरंजीवांशी संबंधित आहे का हे?'' अश्वत्थाम्यानं विचारलं. ''नागेंद्रच्या पायावर जन्मखूण आहे; पण तू

देवध्वज आहेस, तो नाही असं तू म्हणतोस, याचा अर्थ काय? तुझ्या स्मृतींमध्ये आम्ही सगळ्यांनी पाहिलं आहे की देवध्वजाच्या पायावर ती जन्मखूण होती. तुझ्या दाव्याप्रमाणे जर आता, ती नागेंद्रला आहे, तर नागेंद्र देवध्वज आहे, तू नाहीस, असा अर्थ निघतो.''

''आम्ही एकच मूल म्हणून जन्मलो आणि आमचं नाव देवध्वज ठेवलं गेलं, विष्णुयश आणि लक्ष्मी यांचा मुलगा. ज्या ठिकाणी तीन सागर एकत्र येतात, अशा दूरवरच्या ठिकाणी आमचा जन्म झाला. एका अत्यंत अलौकिक रात्रीच्या अत्यंत काळोख्या प्रहरी आणि ब्राह्ममुहूर्ताच्या पहिल्या तासात, माझ्या आईनं एका अचानक प्रकटलेल्या आणि योग्य समयी तिथे येऊन पोचलेल्या पुरुषाच्या मदतीनं आम्हाला जन्म दिला आणि मदतीसाठी गावकरी गोळा होण्याच्या आत तो तिथून नाहीसा झाला. माझ्या लहानपणी आम्हाला ही घटना अनेकदा सांगितली गेली,'' ओम कृपाचार्यांकडे बघत म्हणाला. काही दिवसांपूर्वी, सूक्ष्म रूपात असताना त्यानं कृपाचार्यांच्या आदेशाचा अव्हेर करून एकटीनेच प्रसववेदनांशी संघर्ष करत असलेल्या गरोदर स्त्रीला मदत केली होती. ''माझ्या आईनं काहीतरी कहाणी रचून सांगितली असावी किंवा प्रसववेदनांनी विव्हळत असताना तिला भास झाला असावा, असंच मला वाटत आलं होतं. त्या वेळी हे कुणालाच कधी कळलं नाही; पण आता मला हे कळून चुकलं आहे की, माझ्या आईला प्रसूतीत मदत करणारा दुसरा-तिसरा कुणीच नसून तो मी होतो. कदाचित कृपाचार्य योग्य तेच सुचवत होते की आम्ही तिथे कोणतेही बदल करायला गेलो नव्हतो, तर फक्त प्रेक्षक म्हणून गेलो होतो. कदाचित त्या बालकानं पृथ्वीवर येणं हे विधिलिखित नव्हतं. हे घडायला हवं होतं की नाही हेही आता मला ठाऊक नाही; कारण मी नागेंद्रला जन्मण्यासाठी मदत केली.''

''तुला तुझ्या भूतकाळात घेऊन जाण्याआधीच आम्ही कदाचित तुझं अस्तित्व पुसून टाकायला हवं होतं; कारण आता या पृथ्वीला तुझ्यापासून धोका आहे.'' कृपाचार्य रागानं फूत्कारले आणि तिथून जायला निघाले. ओमला वेद व्यासांजवळ सोडून परशुराम आणि अश्वत्थामा कृपाचार्यांच्या मागे गेले.

''मला काही प्रश्न पडले आहेत ओम,'' वेद व्यास हळुवारपणे

म्हणाले.

''ऋषिवर्य! तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील; पण वृषकपीचा जीव अजून धोक्यात आहे. मला आधी त्याला मदत केली पाहिजे,'' शांतपणे ओम म्हणाला आणि त्या खोलीतून बाहेर पडला.

ओम वृषकपीकडे गेला आणि तो अजूनही बेशुद्धावस्थेत असल्याचं त्याला दिसलं. ओम त्याच्या जवळ गेला आणि त्यानं तिथे असलेल्या साधूंना वृषकपीला पालथं झोपवायला सांगितलं. त्यांनी त्याप्रमाणे केलं. वृषकपीची जखम नीट बांधलेली होती. ओमनं त्याच्या जखमी खांद्याचं बारकाईनं निरीक्षण केलं. जखमेच्या आजूबाजूची त्वचा काळी पडली होती आणि सडली होती. त्वचेखालच्या रक्तवाहिन्या स्पष्टपणे दिसत होत्या आणि त्याही काळ्या पडल्या होत्या.

''हे झपाट्यानं पसरत चाललंय. आम्हाला ज्ञात असलेले सगळे उपाय आम्ही केले; पण या विषाचा कोणताही उतारा नाही,'' एक साधू म्हणाला, त्याच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट दिसत होती.

ओमनं त्या साधूकडे पाहिलं आणि म्हणाला, ''जो त्याला चावला तोच त्याचं विष बाहेर काढू शकतो. तरच त्याचं शरीर त्या विषापासून मुक्त होऊ शकतं.''

''पण नागेंद्र तर मेला आहे, अश्वत्थाम्यानं त्याला मारलं. याचा अर्थ वृषकपीचा मृत्यू आता अटळ आहे असाच होतो, हो नं?'' सहानुभूतिपूर्वक वृषकपीकडे बघत एक साधू म्हणाला.

ओमनं हळुवारपणे वृषकपीच्या जखमेवरची पट्टी काढली आणि जखमेवर आपले तळवे टेकवले. त्याला इतक्या तीव्रतेनं वेदना जाणवू लागल्या की त्याचा चेहरा वेदनेनं पिळवटून निघाला.

हळूहळू वृषकपीच्या जखमेचा व्रण भरून येऊ लागला; पण त्याच वेळी ओमच्या खांद्यावर रक्ताचा एक डाग त्या साधूंना वाढताना दिसू लागला. वृषकपीला ज्या ठिकाणी जखम झाली होती, त्याच जागी, पण ओमच्या शरीरावर तो डाग वाढू लागला. काही क्षणांतच ओमची पाठ रक्तानं भिजली आणि त्याला अशक्तपणा जाणवू लागला, त्याला उभं राहवेना, तो खाली बसला. वृषकपीला गुंडाळलेलं कापड साधूंनी काढलं

आणि ते बुचकळ्यात पडले. वृषकपीची जखम पूर्णपणे भरली होती आणि चमत्कार म्हणजे ती ओमच्या शरीरावर स्थानापन्न झाली होती. वृषकपीला वाचवण्यासाठी ओमनं ती स्वत:वर घेतली असल्याचं त्यांना कळलं.

त्यांनी घाईघाईनं ओमची जखम बांधायला सुरुवात केली आणि ते करताना त्यातल्या एका साधूनं विचारलं, ''तू हे का केलंस?''

''कारण, त्याच्या या अवस्थेला मी जबाबदार आहे, त्यामुळे त्याच्या वेदना आणि जखमही मी माझ्यावर घेतल्यात.''

त्याच्या म्हणण्याचा अर्थ त्या साधूंना समजला नाही; पण त्यांनी अधिक चौकशी करण्यापूर्वीच ओम म्हणाला, ''वृषकपीचा धोका आता टळला आहे. तो बरा होईल.''

''तू हे कसं केलंस?'' साधूनं विचारलं.

''ही फार जुनी, विस्मरणात गेलेली पद्धत आहे.''

''आमच्यापेक्षाही जुनी?''

''सगळ्या चिरंजीवांपेक्षा जुनी, माझ्याहीपेक्षा.''

''तू ती आम्हाला शिकवशील का?''

''ती अशी शिकवता किंवा देता येत नाही. मला माफ करा.''

त्याच वेळी, वेद व्यासांनी झोपडीत प्रवेश केला. आदरापोटी ओमनं उभं राहण्याचा आणि त्यांच्याकडे चालत जाण्याचा प्रयत्न केला; पण विषानं त्याच्यावर परिणाम करायला सुरुवात केली होती. त्यानं उठून काही पावलं टाकण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला ताठ उभं राहण्यासाठी भिंतीचा आधार घ्यावा लागला.

''तू बरा आहेस नं?'' त्याला पडण्यापासून वाचवत काळजीनं वेद व्यासांनी विचारलं.

वेद व्यासांच्या मदतीनं ओमनं जमिनीवर बसकण मारली आणि तो हसला. ''हो ऋषिवर्य! मी ठीक होईन.''

ओम भिंतीला टेकून बसला तसं वेद व्यासांनी विचारलं, ''तुला अचानक सगळं आठवायला कसं लागलं?''

''कुलधाराला भुतांच्या गावात, माझ्याशी अटीतटीची लढाई लढताना नागेंद्रचा चेहरा रक्तानं माखला होता. मृत संजीवनीची प्रक्रिया


पूर्ण करण्यासाठी लागणारी शेवटची गोष्ट मिळवण्यासाठी तो माझ्या पाठीवर चढला होता – ती म्हणजे माझं रक्त. त्यानं माझ्या खांद्याचा चावा घेतला, तेव्हा मी वेदनेनं ओरडलो; पण तो ते रक्त ओढून गिळणार तोच अश्वत्थाम्यानं त्याचं डोकं उडवलं आणि तो रक्त गिळू शकला नाही. मात्र, त्याच्या चाव्यामुळे मी वेदनेनं ओरडलो तेव्हा त्याच्या रक्ताचा एक थेंब माझ्या जिभेवर पडला. त्याचं रक्त... जे खरंतर माझंच रक्त आहे. त्यामुळे माझ्या सगळ्या स्मृती परत आल्या आणि नागेंद्र निराश झाला.''

''जर तुमच्या दोघांचं रक्त एकच आहे, तर त्याला तुझं रक्त का हवं होतं?''

''कारण, माझ्या शरीरातलं रक्त, ज्याच्या मागे तो होता, ते धन्वंतरींचं आहे आणि त्या रक्तात त्याला अमर, चिरंजीव बनवण्याचे ते सगळे गुणधर्म आणि शक्ती होती. मला ज्या वेळी धन्वंतरींकडे आणण्यात आलं, तेव्हा मी मृतावस्थेत होतो आणि माझ्या शरीरातलं जवळजवळ सगळं रक्त वाहून गेलं होतं. जे काही थोडंफार उरलं होतं, ते धन्वंतरींपर्यंत पोचेपर्यंत हिमालयातल्या वाटचालीत गोठून गेलं होतं. त्यांनी मृत संजीवनीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर स्वतःचं रक्त माझ्या शरीरात भरलं आणि यात सुश्रुतांनी त्यांना मदत केली. हे सत्य धन्वंतरी आणि सुश्रुत यांच्याखेरीज अन्य कुणालाही माहीत नव्हतं. नंतर नागेंद्रनं जरी धन्वंतरींना बंदिवान बनवून ठेवलं होतं, तरी त्याला मृत संजीवनीची पुस्तकं हस्तगत करता आली नव्हती. पुस्तकं त्याच्या ताब्यात येण्याच्या आधीच तो धन्वंतरींना गमावून बसला होता, त्यासाठी मिलारेपाचे आभार मानायला हवेत. धन्वंतरींना मारल्याबद्दल मी त्याला माफ करू शकलो असतो तर बरं झालं असतं; पण दुर्दैवानं मी तसं करू शकत नाही.''

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# द स्टोरीज वी टेल

**देवदत्त पट्टनायक**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

पृष्ठे : १८४

किंमत : २७०

*पोर्तुगिजांच्या धर्मांतररूपी अत्याचाराच्या भीषण वास्तवाचं चित्रण करणारी करुणार्द्र आणि ज्वलंत कादंबरी*

### कथा १
### कथा आठवताना...

मी ऐकलेल्या सर्व कथांची मी आधी ऐतिहासिकदृष्ट्या व नंतर भौगोलिकदृष्ट्या विभागणी करतो.

ऐतिहासिकदृष्ट्या सांगायचे, तर मी ५०० वर्षांचे

‘मॉडल’ वापरतो. मी गेल्या ४००० वर्षांचे ५००-५०० वर्षांचे भाग पाडतो - हा खूप व्यापक पट आहे. पण त्याचा वर्गीकरणासाठी उपयोग होतो.

१. ख्रिस्तपूर्व २०००:सिंधू खोऱ्यातील संस्कृतीसोबत प्रागैतिहासाची अखेर होते. या मूक नगरांच्या मुद्रा अनेक कहाण्या सांगतात, ज्यांचा अर्थ उलगडण्याच्या प्रतीक्षेत आहे.

२. ख्रिस्तपूर्व २००० ते १५०० : इतिहासातील या काळाबद्दल खूप कमी माहीत आहे.

३. ख्रिस्तपूर्व १५०० ते १००० : वैदिक काळ. या दरम्यान चारी वेदांची रचना झाली. पंजाब व हरयाणा प्रदेशातील कुरू व भरत यांची आपल्याला प्रथमच ओळख झाली. ज्यामध्ये इंद्र नायक आहे अशा काही कथा आपल्याकडे आहेत.

४. ख्रिस्तपूर्व १००० ते ५०० : यादरम्यान उपनिषदांची रचना झाली आणि गंगेच्या पठारांवर पुनर्जन्माची संकल्पना भक्कमपणे स्थापित झाली.

५. ख्रिस्तपूर्व ५०० ते ० : अशोक व खारवेल यांच्यासोबत बौद्ध धर्म व जैन धर्म प्रसिद्ध झाले. रामायण व महाभारत लिहिले गेले. जातक केवळ लिहिलेच गेले नाही, तर ते स्तुपांच्या कठड्यांवर कोरलेसुद्धा गेले. दख्खनमध्ये सातवाहनांचे राज्य होते.

६. ० ते सन ५०० : याच दरम्यान मूळचे नैर्ऋत्य चीनमधील कुषाण भारतात आले. त्यांनी मध्य आशिया व अफगाणिस्तानचे विस्तृत भाग काबीज केले होते. सूर्याच्या प्रतिमा दिसू लागल्या होत्या. यादरम्यान गुप्तही सामर्थ्यशाली होते, त्यांच्या सुवर्णमुद्रा हे समृद्धीचे चिन्ह होते, आणि बहुभुज देवांच्या प्रतिमा लोकप्रिय झाला होत्या. त्याच दरम्यानच्या, विष्णूच्या वराहरूपातील पहिल्या प्रतिमा मध्यप्रदेशात आढळतात. तमिळ संगम साहित्य कथांसह उदयास आले, ते दक्षिणेत बौद्ध व जैन कल्पनांचे प्रभुत्व दर्शवते. त्यानंतर शिव व विष्णू यांच्या कथा आल्या.

७. सन ५०० ते १०००: पुराणे औपचारिकरीत्या लिहिली गेली. झाशी नजीकच्या देवगडमधील एका प्राचीन हिंदू मंदिरात प्रथमच अनंतशयन रूपातील विष्णूच्या प्रतिमा पाहायला मिळतात. त्यामध्ये विष्णू अनंत

सर्पावर शांतपणे निद्रित आहेत. दक्षिण भारत ही मोठी शक्ती बनली होती. या काळात बौद्ध धर्माला उतरती कळा लागली होती.

८. सन १००० ते १५०० : गझनीच्या महमूदाने भारतावर आक्रमण केले, त्यानंतर घोरी भारतात स्थलांतरित झाला. त्याने दिल्ली सल्तनत निर्माण केली. याच दरम्यान मदुराई मीनाक्षी व जगन्नाथ पुरी अशी काही सर्वांत भव्य मंदिरे उभारण्यात आली. याच काळात दख्खनमध्ये विजयनगर राजांचा उदय झाला आणि त्यांनी, ते ज्याला 'तुरूक धर्म' म्हणत असत, त्यापासून 'हिंदू धर्माचे रक्षण केले. याच काळात दक्षिण व पौर्वात्य भारतात रामायण व महाभारतावरील प्रादेशिक रचना दिसतात.

९. सन १५०० ते २०००: यादरम्यान शीख धर्माचा उदय झाला आणि दक्षिणेतून आलेल्या भक्ती चळवळीने उत्तरेत चांगलाच जोर पकडला. या काळात मुघल, मराठे व ब्रिटिश राज या सर्वांकडे सत्ता व प्रतिष्ठा होती, १९४७ साली भारत प्रजासत्ताक बनेपर्यंत. याच दरम्यान उत्तरेत रजपूत महाकाव्ये रचली गेली आणि भारतातील जवळजवळ प्रत्येक प्रदेशात आपापल्या प्रादेशिक कथा आहेत.

भौगोलिकदृष्ट्या विचार केला, तर आपल्याला माहीत असलेल्या, हिंदू पाया असणाऱ्या बहुतेकशा कथा उत्तर भारतातील आहेत, पण जसजसा त्यांचा प्रसार उपखंडाच्या इतर भागात झाला, तसे त्यांचे रूप बदलले. आठव्या शतकात दक्षिणेत भक्ती साहित्याचा उदय झाला असला, तरी ते सन पंधराशेच्या दरम्यान उत्तरेत पोहोचले व तिथे त्याचे सार्थकही झाले.

तर मग या चौकटीचा कशा प्रकारे उपयोग होतो? जेव्हा कुणी 'रामानुज' म्हणते, तेव्हा माझ्या मनात तमिळनाडू येते. मला बारावे शतक आठवते. जेव्हा कुणी 'अलवर' म्हणते, तेव्हा माझ्या मनात तमिळनाडू येते, मला सहावे-सातवे शतक आठवते. एखाद्या कपाटात वेगवेगळे कप्पे असावेत, तसे इतिहास व भूगोल कथांचे व्यक्तित्वांचे व पुराणकथांचे वर्गीकरण करते. कधीकधी सर्वप्रथम माझ्या मनात येते ते त्या कथेचे स्थान, म्हणजेच देश. कधीकधी सर्वप्रथम माझ्या मनात येतो त्या कथेचा काळ. कधीकधी माझ्या मनात येतो त्या कथेचा आशय किंवा तिचे गुणवैशिष्ट्य. त्यामुळे देश-काल-गुण अशा चौकटींचा उपयोग होतो.

मला भूगोल महत्त्वाचा वाटतो, कारण स्थानिक कथा नेहमीच संस्कृत कथांपेक्षा अधिक महत्त्वाच्या असतात, कारण संस्कृत ही जनसमुदायाची भाषा कधीच नव्हती. मी जिथे राहतो, त्या महाराष्ट्रात अभंग व ओव्या अशी स्थानिक मराठी गीते, आणि एकनाथ, ज्ञानेश्वर, खंडोबा पंढरपूर, विठ्ठल स्वामी हे खूप महत्त्वाचे आहेत.

ओडिशामध्ये - माझे मातापिता तिथले आहेत - बहुतेकशा कथा जगन्नाथ व साक्षी गोपाल यांच्याबद्दलच्या आहेत. आंध्र प्रदेशात अन्नमय्या व तिरुपती यांच्या कथा आहेत.

आपण एक गोष्ट लक्षात घेणेही महत्त्वाचे आहे, ती म्हणजे, भव्य चित्रावर लक्ष केंद्रित करताना- हिंदू - बौद्ध -जैन कथांची रचना या कथा स्थानिक परंपरांत कशा झिरपत गेल्या, किंवा आज आपण ज्याला 'मुख्य प्रवाहातील मानतो' त्या मोठमोठ्या कथनांवर स्थानिक परंपरांचा कशा प्रकारे परिणाम घडतो याचा आपल्याला विसर पडतो. गेल्या ५०० वर्षांत ज्या शीख कथा उदयास आल्या, किंवा पर्शिया व मध्य आशियातून पारशी धर्म व इस्लामद्वारे ज्या पुराणकथा भारतात आल्या, त्याकडे आपण दुर्लक्ष करतो. तसेच, भारतात पाचशेहून अधिक जमाती आहेत, भारताच्या लोकसंख्येच्या सुमारे ८ टक्के, आणि या प्रत्येक जमातीच्या आपापल्या अनोख्या कथा आहेत. झारखंडमधल्या जमातींसारख्या अनेक जमातींमध्ये मुख्यत्वे 'सरनावाद' अनुसरला जातो. इतर बऱ्याच जणांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे.

ते एकमेकांना कोणत्या कथा सांगत असतील?

## कथा २
## इतिहास व पौराणिक कथा

पौराणिक कथांचा इतिहासाच्या संदर्भात विचार करणे महत्त्वाचे आहे, मात्र या दोन्हींची गल्लत कधीही होता कामा नये.

आपण रामायणातली एक कथा पाहू. त्या कथेत शबरी रामाला तिने उष्टी केलेली बोरे खाऊ घालते. ही वाल्मिकी अथवा तुलसीदास रामायणातील कथा नव्हती. ही कथा या संहितेच्या हिंदी आवृत्तीत साधारण अठराव्या शतकाच्या दरम्यान आली.

रामाची आणखीही एक कथा आहे, त्यामध्ये राम सावरुनी या जंगलातील आदिवासी स्त्रीला उष्टा आंबा मागतात, कारण तो आंबा गोड आहे हे कळलेले असते. ही कथा सुमारे ५०० वर्षांपूर्वी ओडिशामध्ये आढळली आहे. ही कथा शबरीच्या कथेसारखीच आहे. त्यामुळे आपण कथांच्या इतिहासाचा व भूगोलाचा वापर करून, या कथा कोठून आल्या याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करू शकतो, आणि जर आपण भाग्यवान असू, तर मुळात या कथा का सांगितल्या गेल्या याचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न करू शकतो.

अशाच प्रकारे, विष्णूचे अवतार ही संकल्पना महाभारतात अथवा रामायणात आढळत नाही. ही संकल्पना इसवी सन ५००च्या सुमारास पुराणांमध्ये दिसते. आज आपण जो शब्द नेहमी वापरतो, तो 'धर्म' हा शब्दसुद्धा ऋग्वेदात क्वचितच आढळतो आणि त्याला उपनिषदांमध्येही महत्त्व दिलेले नाही. ही संकल्पना महाभारतात व रामायणात समोर येते.

असे का?

आपल्याला याची कारणे शोधावी लागतील, आणि त्याचमुळे पौराणिक कथा त्यांच्या ऐतिहासिक संदर्भाच्या चौकटीत ठेवणे महत्त्वाचे ठरते - अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी.

सन १६०० पासून भक्तिकाव्याला महत्त्व आले. सन ६०० मध्ये, तमिळनाडूत अलवार व नयनार यांच्या भावपूर्ण रचना आल्या, तिथून वल्लभाचार्य व रामानंद यांनी त्या उत्तरेत नेल्या. तिथे कबीर, मीराबाई, नरसी, हरिदास, जगन्नाथ दास व रक्षण यांनी ती संकल्पना पुढे नेली.

या ठिकाणी कालावधी का महत्त्वाचा आहे?

कारण इस्लामचे आगमन व भक्ती यांच्यामध्ये दृढ परस्परसंबंध आहे. दोघांचाही परस्परांवर प्रभाव आहे. निर्गुण भक्ती, जी अल्लाहसारख्या निराकार परमेश्वराची आराधना करते, काळाच्या ओघात अत्यंत महत्त्वाची बनली. त्याचबरोबर, फुलांचा वापर भारतातील सुफी 'दर्गा' परंपरेत महत्त्वाचा बनला. काळाच्या ओघात, आपण अनेक सांस्कृतिक आदानप्रदान घडलेले पाहतो आणि त्यातूनच कथा बदलतात आणि त्यांचा अर्थही बदलतो.

उदाहरणादाखल सांगायचे, तर हिंदू धर्म व इस्लाम जिथे येऊन मिळतात, तिथे शीख धर्म येतो. सुमारे पाच शतकांपूर्वी, गुरू नानकांनी स्थापन


केलेला हा धर्म प्रारंभी हिंदू धर्माच्या भक्ती परंपरेतून आला, आणि त्यानंतर हळूहळू धर्म म्हणून स्थिरावला. या धर्माने जातीव्यवस्था व मूर्तिपूजा पूर्णपणे नाकारली. इथे ग्रंथाला खूप महत्त्व दिलेले आहे - हा इस्लामी प्रभाव आहे, ते लोक पवित्र कुरआन परमपूज्य मानतात. मात्र हा ग्रंथ आसनावर ठेवला जातो, छत्रीखाली चादर अंथरून, पालखीमध्ये - ही हिंदू संकल्पना आहे.

अशा प्रकारे शीख धर्माचा भूगोलही लक्षात येईल - वायव्येकडे, जिथे इस्लाम व हिंदू धर्म एकत्र येतात. पूर्वी शीख धर्म हा हिंदू धर्माचा व सूफीवादाचा भाग मानला जात असे, पण विसाव्या शतकात, तो वेगळा धर्म मानला जाण्यासाठी चळवळ उभी राहिली, आणि हा धर्म स्थापन झाला.

काळाच्या ओघात, शीख धर्माने स्वत:च्या अद्वितीय परंपरा विकसित केल्या, त्यातील मुख्य संकल्पना सामाजिक समानता होती. 'लंगर' हा त्यातील अत्यंत महत्त्वाचा घटक होता. संतांनी रचलेल्या सर्व काव्याचे गुरू ग्रंथ साहिबमध्ये संकलन आहे. प्रत्येक गुरुद्वारात हा ग्रंथ असतो. यावरून असे दिसते, की जर तुमची इच्छा असेल, तर आपल्या आयुष्याचा प्रत्येक पैलू काळाच्या ओघात घडणाऱ्या सांस्कृतिक घुसळणीचा परिपाक म्हणून पाहता येऊ शकतो.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## खुलभर दुधाची कहाणी

**सुनंदा अमरापूरकर**

पृष्ठे : ४१२
किंमत : ५९०

*सदाशिव अमरापूरकर या नावातील जादू उलगडून सांगत असतानाच एका संयत आयुष्याची जीवनकहाणी मांडणारं आत्मकथन*

मी या आठवणी का लिहिल्या?

वयाच्या एका ठरावीक टप्प्यावर पोहोचल्यावर सगळ्याच माणसांना आपल्या भूतकाळाच्या आठवणी प्रकर्षाने येऊ लागतात. मीही त्यातलीच एक. मला

२५

लहानपणातल्या सगळ्या गोष्टी फार तपशीलवार आठवायच्या आणि सगळ्यांना किस्से सांगावेत याचीही आवड. ते ऐकून माझी भाची वैदेही रानडे, मुलगी सायली, माझी मैत्रीण दीप्ती रेळे नेहमी मला सांगायच्या, की तू हे सगळं लिहून काढ. वाचायला मजा येईल. जेव्हा तशी वेळ आली, आणि स्वत:बद्दल, स्वत:शी विचार करण्याइतपत मनाला आणि शरीराला सवड मिळाली, तेव्हा मी या आठवणी लिहू लागले; पण त्यात सातत्य नव्हतं. मध्ये-मध्ये बराच खंड पडत होता; कारण मन त्या काळात पुन्हा-पुन्हा मागे भटकायला जायचं. अखेर एकदा ते लिहून पूर्ण झालं. सदाशिव गेल्यानंतर 'आता काय? आयुष्य आहे तोपर्यंत जगायचं!' अशी मनोभावना असल्यामुळे तिथपर्यंतचाच काळ यात आलेला आहे.

हल्ली कुणी मुलाखत घ्यायला येतात, तेव्हा एक प्रश्न हमखास विचारतात– 'तुम्ही या रिलेशनशिपकडे कसं पाहता?' रिलेशनशिपकडे पाहायचं? म्हणजे त्यातून जरा अलिप्त होऊन? अवघड आहे. ते नातं जडलं तेव्हा, त्याला व्यावहारिक मान्यता मिळाली तेव्हा, आणि नंतर इतकी वर्षं निभावलं तेव्हाही त्यातून क्षणभरासाठी बाहेर येऊन अलिप्तपणे पाहावं असं वाटलं नाही कधी. पुढे-पुढे तर असं मुरत गेलं ते नातं, की आपण स्वत: ते जोडलं आहे, हेदेखील विसरलो आम्ही दोघं! जन्मत:च काही नाती मिळतात आपल्याला, तितकंच ते सहज आणि नैसर्गिक वाटायला लागलं.

सदाशिव होता त्या दिवसापर्यंत मी त्याच्या प्रभावातून बाहेर पडलेच नाही. माझं मन, माझं भावविश्व तर त्यानं व्यापलं होतंच; पण प्रत्यक्षातसुद्धा, एखाद्या सूर्यफुलानं सूर्य उगवल्यापासून त्याच्या दिशेनं मान वळवावी तशी अवस्था मी वर्षानुवर्षं अनुभवलेली आहे. त्यामुळे त्यातून बाहेर पडायला मला तसा बराच वेळ लागला. काही लिहायचं, म्हणजे त्या दिवसांकडे जरा दूर होऊन बघणं गरजेचं होतं. इतक्या विविध घटना, इतके प्रसंग, बराचसा चढ, काही उतार, मोठा कालखंड आणि सगळा काळ अत्यंत समरसतेनं जगलेला. क्षणन्‌क्षण, कण अन् कण मनापासून व्यतीत केलेला. अचानक अंगावर आलेला लोकप्रियता आणि पैसा यांचा ओघ,

हे सगळं ‘लोकेषणा आणि वित्तेषणा’ यांचा तोल साधत सांभाळणं सोपं नव्हतं. घडलं होतं सगळं उत्स्फूर्तपणेच. त्यावेळी थांबून पाहायला सवड नव्हती. त्यामुळे विलंब अपरिहार्य होता. शिवाय सदाशिवच्या प्रसिद्ध नावाचंदेखील दडपणच होतं माझ्या मनावर. याच्या उलट बालपणाचा काळ मात्र मनात लख्ख होता. त्याबद्दल लिहिताना ना कसलं बंधन होतं, ना कुठलं दडपण. त्यामुळे बालपणाचा काळ फार झटक्यात, एकटाकी लिहून झाला.

नगरसारख्या ग्रामीण शहरात, एका सामान्य ब्राह्मण कुटुंबात जन्माला आलेल्या मुलीच्या जन्माची गाठ तिच्याबरोबर शिकणाऱ्या, तिला आवडलेल्या गावातल्याच एका तरुणाशी पडली होती. आणि ‘हिने त्याच्यात असं काय पाहिलं बुवा?’ ही त्यावेळी तिला ओळखणाऱ्या लोकांची सर्वसामान्य प्रतिक्रिया होती; पण नंतर मात्र असं काही घडत गेलं, की तिच्या जगण्याची परिमिती बदलत गेली. अंगातल्या अभिनयगुणाने तिच्या नवऱ्याला एका रात्रीत हिंदी चित्रपटातील स्टार पदावर नेऊन बसवलं. माझ्यासाठी तर सहज नाटकात भेटला काय, आवडला काय आणि मनापासून दोघं जन्मभरासाठी एकमेकांचे झालो काय. सगळंच एखादं सुंदर स्वप्न सत्यात उतरल्यासारखं घडलं होतं. माझं सुदैव असं, की हे स्वप्न सत्यात रूपांतरित झाल्यानंतर व्यवहाराचे अनेक टक्केटोणपे खात राहिलो. भोवंडलो, भेलकांडलो; पण तुटलो नाही की एकमेकांना दुरावलो नाही.

वयाच्या दहाव्या वर्षी आम्ही एकमेकांना ओळखायला लागलो. पुढे योग्य वयात लग्न झाल्यावर तब्बल ४१ वर्षं एकमेकांबरोबर संसार केला. आमचं नातं कळी उमलावी, तसं सहज, नकळत जुळलं; आणि जगताजगता आपोआप कायम राहण्यासाठी पक्कं होऊन गेलं! त्याच्यासाठी खरंतर ही आकड्यातली मोजमापं, हे तपशील गैरलागू ठरतात. तरीसुद्धा वयाचा विशिष्ट टप्पा पार केल्यानंतर, जरा, थांबून, सावकाश मागे वळून, आपल्याच आयुष्यात घडलेल्या घटनांकडे बघणं, हे तारुण्यात आवडलेल्या 'Black and White' चित्रपटातल्या गाण्यांची

ध्वनिचित्रफीत बघितल्यासारखा आनंद देतं, हे खरं!

माझं आयुष्य चारचौघींपेक्षा वेगळं होतं. त्यामुळे हे वेगळेपण प्रत्यक्षात कसं होतं, ते सगळ्यांना समजावं असं मला वाटलं.

जळातील मासा झोप घेई कैसा?

जावे त्याच्या वंशा, तेव्हा कळे

या काव्यपंक्तीप्रमाणे, ते वेगळं जीवन मला कळलं, मी प्रत्यक्ष जगले. जगताना आलेले अनुभव इतरांबरोबर वाटून घ्यावेत, ही या आठवणी लिहिण्यामागची माझी एक भावना होती.

माझा नवरा सदाशिव असंख्य लोकांचा आवडता होता. त्यांचं प्रेम त्याच्या पडद्यावरच्या रूपावर, आवाजावर, त्याच्या कलेवर होतं. त्याच्या समाजातल्या प्रतिमेवर होतं; पण मी बंडू अमरापूरकर या हाडामांसाच्या माणसावर प्रेम केलं. आमची गाठ पडल्यानंतर पुढे कित्येक वर्षांनी तो 'सदाशिव अमरापूरकर द सेलिब्रेटी' झाला. माझ्या नजरेसमोर तो मोठा होत गेला. त्यामुळे माझ्या त्याच्याबद्दलच्या आठवणींची जातकुळी वेगळी आहे. किनाऱ्यावर उभं राहून भरतीच्या लाटांची गाज ऐकणं, उसळणाऱ्या प्रचंड पाण्याचं दृश्य पाहणं आणि प्रत्यक्ष समुद्रात उभं राहून तो पाण्याचा लोंढा अंगावर घेणं, यात जो फरक असतो, तो इतरांच्या आणि माझ्या अनुभवांत आहे. त्यामुळे जे माझ्या म्हणण्याशी सहमत नसतील, त्यांनी कृपया माझ्याबद्दल गैरसमज करून न घेता मला समजून घ्यावं.

यात लिहिलेल्या सगळ्या आठवणी, प्रसंग प्रत्यक्षात घडलेले आहेत. त्या-त्या वेळच्या माझ्या खऱ्या भावना, प्रतिक्रिया लिहिल्या गेलेल्या आहेत. कुणाला मी नकळत दुखावले असेल, तर हात जोडून क्षमा मागत आहे. माझं जीवन, आठवले तेवढे अनुभव इतरांसमोर ठेवणे, एवढाच उद्देश माझ्या लेखनाचा आहे. एक मुलगी म्हणून, स्त्री म्हणून, कन्या, पत्नी आणि आई म्हणून जगताना जे अनुभवलं, ते इतरांसोबत वाटण्याचा हा प्रयत्न आहे. मला कोणतीही कैफियत मांडायची नाही. कोणाविषयी कसलीही तक्रार करायची नाही; पण हे पुस्तक लोकांनी वाचलं आणि त्यातील त्यांना काही आवडलं, त्यातून काही मिळालं, तर

मला आनंद वाटेल.

'ज्याचा त्याचा विठोबा' नाटकात तुकारामांच्या 'आलो याचि कारणासी' या अभंगाचं निरुपण करताना आनंद विनायक जातेगावकर लिहून गेले, 'एकदा माणसाला जगण्याचं कारण सापडलं ना, की अर्थ आपोआप येतो जीवनाला!'

सदाशिवला त्याच्या जगण्याचं कारण सापडलेलं होतं. त्याचसाठी त्यानं जीवनात अट्टहासही केला. त्याची सावली होऊन मी जगले; पण स्वत:च्या जगण्याचं कारण मात्र शोधलं नाही. या आठवणी लिहिताना ते कारण शोधण्याचाही माझा एक हेतू होता. ते स्पष्टपणे लक्षात आलं– एका असामान्य कलावंताची आणि नशीबवान माणसाची प्रापंचिक बाजू सांभाळत, तो आणि त्याची मुलंबाळं यांच्यात रमून जाणं, त्यांच्या रंगात रंगून राहणं, हेच माझ्या जगण्याचं कारण होतं, म्हणूनच ते करताना आजही मी रमलेली असते. बाकी सगळ्या गोष्टी अलाहिदा!

मला हे स्पष्ट करायला आवडेल, की या माझ्या, म्हणजे सुनंदा करमरकर म्हणून जन्मलेल्या मुलीच्या आठवणी आहेत. तिच्या जीवनाचा एका टप्प्यापर्यंतचा प्रवास यात आलेला आहे. तिचं म्हणजे माझं लग्न सदाशिवशी झालं ही माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना आहे. त्यामुळे त्या अनुषंगानेच सदाशिवबद्दल लिखाण झालेलं आहे; परंतु हे पुस्तक सदाशिव अमरापूरकरचं जीवनचरित्र नव्हे. तसा समज वाचकांनी कृपया करून घेऊ नये. माझा नवरा हा माझा कमी आणि लोकांचा जास्त होता, म्हणून मला हा खुलासा करावासा वाटला.

सदाशिवनं उण्यापुऱ्या साडेतीनशे चित्रपटांची कामं स्वीकारली. त्यात हिंदी, मराठी, बंगाली, हरियाणवी भाषिक चित्रपट होते. त्यातले काही पूर्ण झाले नाहीत, तर काही प्रदर्शित झाले नाहीत; पण त्यांचा तपशील देणं हा उद्देशच इथे नाही. जे उल्लेख आले आहेत, ते त्या-त्या आठवणीचा भाग म्हणून. त्यामुळे त्यातही काही तपशिलाच्या चुका आढळल्यास मला वाचकांनी माफ करावं.


मी हे लेखन केलं, म्हणजे माझ्या मर्मबंधातली ठेवच वाचकांच्या

हातात दिलेली आहे. हे लिहीत असताना वेगवेगळ्या वळणावर ज्या व्यक्ती माझ्या जीवनात आल्या, ज्यांच्याबरोबर सुख-दु:खाचे क्षण मी वाटून घेतले, ज्यांनी माझं जगणं सुसह्य केलं, चार पावलांच्या वाटचालीत सोबत केली त्या सर्वांबद्दल माझ्या मनात कृतज्ञता आहे. माझ्या जीवनात जे-जे प्रसंग घडले, आणि मला आठवले तसे यात लिहिले आहेत. सर्व नावं खरीच आहेत. यात ज्यांची नावं आली, त्या सर्वांनी माझ्या जगण्याला आकार दिला, जीवनात रंग भरले, आणि जगण्याची रंगत वाढवली. कळत-नकळत असेल; पण त्यांच्याबद्दल एक सद्भावना नेहमीच मनात होती, आणि असेल.

**– सुनंदा अमरापूरकर**

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## महाराणी बायजाबाई शिंदे
दख्खनच्या सौंदर्यलतिका

**डॉ. सुवर्णा नाईक-निंबाळकर**

पृष्ठे : १८८
किंमत : २८०

*शिंदे घराण्यातील अद्‌भुत व्यक्तिमत्त्व आणि दख्खनच्या सौंदर्य लतिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बायजाबाई शिंदेयांचे ओघवत्या शैलीतील चरित्र*

### शिंदे घराण्याचा उदय

बाराव्या शतकाच्या अखेरीस राजा रामदेवराय यांचा काळ सुरू झाला. त्यावेळी मुस्लीम आमदानीत ही राज्ये तुरळक अशी राहिलेली होती. नंतर शिवकालापासून हळूहळू या शिंदे घराण्याचा उदय होऊ लागला. छत्रपती

शिवाजी महाराजांच्या सरदारांपैकी कऱ्हाडकडील भागावरील सरदार नेमाजीराव शिंदे हे होत. शिंदे हे मूळचे सातारा जिल्ह्यातील नीरा नदीच्या काठावरील कण्हेरखेड या गावचे पाटील होते. या घराण्याचेच मूळ पुरुष राणोजी शिंदे हे होत. पुढे विजापूर व अहमदनगरच्या मुस्लीम आमदानीत या कुळातील बरीच घराणी देशमुख, पाटील आदी वतने देऊन त्यांच्या आश्रयाखाली कण्हेरखेड, पणदर, लोणंद, बोरवाडी आदी भागात शिंदे यांची घराणी प्रसिद्ध झाली. ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचा मूळ पुरुष राणोजी कण्हेरखेडचे देशमुख-पाटील वतनदार झाले. राणोजीराव शिंदे यांचे वडील नेसरीतील लढाईत प्रतापराव गुजर यांच्यासोबत होते. विठोजीराव शिंदे हे शेंद्रे बेंद्रे, सातारा या गावचे होते. छत्रपती शाहू यांच्या पहिल्या पत्नी 'अंबिकाबाई' या याच शिंदे घराण्यातील होत्या.

सतराव्या शतकापासून राणोजीराव शिंदे यांच्यापासून सुरू झालेली शिंदे घराण्याची घोडदौड १८१८पर्यंत म्हणजे जवळजवळ एक शतकभर चालली होती. मराठ्यांच्या प्रत्येक रणसंग्रामात शिंदे घराणे हे अग्रगण्य होते. शिवपूर्वकाळापासून शिंदे यांची घराणी चालुक्य, राष्ट्रकूट, बहामनी व नंतर आदिलशाही काळातही आपला दरारा कायम राखून होती. रुस्तमराव, रविराव, झुंझारराव हे मानाचे किताब या घराण्याकडेच होते.

ताथवडा या किल्ल्याची किल्लेदारी, पुरंदर, धारवाड, चंदगड, तोरगल, तिकोना या किल्ल्यांची किल्लेदारीही याच घराण्याकडे होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या लढ्यात हे घराणे कायम सक्रिय होते. शिंदे घराण्यातील अनेक पिढ्यांनी रणभूमीवर पराक्रम करून आपले तेज दाखवून दिले व परकीयांचा पराभव केला. अनेक वर्षे परकीयांनी आपल्या हिंदुस्थानावर राज्य करून हिंदू रयतेला जेरीस आणून त्यांना गुलाम बनवले होते. हिंदू जनतेवर धार्मिक, आर्थिक बंधने आणून त्यांचे शोषण केले होते. या परकीय सत्तांना विरोध करण्याचे काम प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी केले होते. या सर्व परकीय सत्तांना छत्रपती शिवाजी महाराजांनी चांगलाच शह दिला होता. या छत्रपतींच्या स्वराज्यरक्षणाच्या कार्यात शिंदे घराण्यातील अनेक वीर पुरुषांनी पराक्रमाची शर्थ करून स्वराज्याच्या कार्यात मोठाच हातभार लावला होता.

शिंदे हे मराठ्यांच्या ९६ कुळीतील एक कूळ आहे. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव या काळातही अनेक पराक्रमी पुरुष होऊन गेले. तसेच बहामनी काळातही अनेक घराण्यातील पुरुषांचे पराक्रम दिसून येतात. अगदी सुरुवातीच्या काळापासूनच शिंदे घराणे हे श्रीमंत व घरंदाज म्हणून ओळखले जाई. शिंदे घराण्यातील अंबिकाबाई यांचा विवाह छत्रपती शाहू महाराज (थोरले) यांच्याशी लावून देण्यात आला होता. याच घराण्यात अनेक पराक्रमी पुरुष होऊन गेले. त्यांपैकी जनकोजी शिंदे यांचे पुत्र राणोजी शिंदे हे होत. छत्रपती शाहू महाराजांनी अत्यंत विश्वासू सरदार म्हणून आपल्या सैन्यात त्यांना दाखल करून घेतले होते.

राणोजी शिंदे प्रथमपासूनच उच्च पदावर कार्यरत राहिले होते. राणोजी यांनी आपल्या अंगच्या गुणसामर्थ्यामुळे व पराक्रमामुळे छत्रपतींची मर्जी संपादन केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा अवलंब केला, त्याचप्रमाणे राणोजी शिंदे यांनी आपली स्वत:ची युद्धपद्धती अवलंबून स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटवला. पुढे नंतरच्या काळात उत्तर प्रदेशात मराठ्यांनी आपले वर्चस्व वाढवण्यासाठी अनेक मोहिमा सुरू केल्या. यामध्ये मराठ्यांना अनेक ठिकाणी विजय मिळून अनेक ठिकाणचे सरंजामसुद्धा मिळाले. या मिळालेल्या सरंजामात राणोजी शिंदे यांना माळव्याचा सरंजाम मिळाला. माळव्यातील पहिले केंद्र म्हणजे 'अवंतीनगरी.' अवंतीनगरी म्हणजे बारा ज्योतिर्लिंगांपैकी महांकालेश्वराचे स्थान असून, ते क्षिप्रा या नदीकाठी वसलेले आहे. प्राचीन काळापासूनच अवंतीनगरीचा उल्लेख प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून केला जातो. भारताचे उत्तर भारत व दक्षिण भारत हे दोन भागविंध्य पर्वतामुळे पडले असले, तरी उत्तर आणि दक्षिण यांना जोडणारा रस्ता माळवा प्रांतातून किंवा मालव देशातून जातो. विंध्य व सातपुडा पर्वताच्यामध्ये नर्मदा नदी आहे. नर्मदा नदी ओलांडली की माळव्याचा पठारी व सुपीक प्रदेश लागतो.

हिंदुस्थानच्या इतिहासात छत्रपती संभाजी महाराजांनी ब्रह्मपुरावर हल्ला करून मोगलांना सळो की पळो करून सोडले होते. माळव्याचे प्रवेशद्वार म्हणजे आशिरगडचा किल्ला. छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्याची धुरा रणरागिणी महाराणी ताराराणीसाहेबांवर येऊन पडली.

ताराराणीने उत्तरेत मोठमोठ्या मोहिमा काढल्या व त्याची जबाबदारी नेमाजी शिंदे यांच्याकडे दिली. नेमाजी शिंदे अतिशय शूर होते. औरंगजेबाच्या कारकिर्दीत नेमाजी शिंदे यांनी माळव्यावर स्वारी केली होती. औरंगजेब ज्यावेळी दक्षिणेच्या मोहिमेवर होता, त्यावेळी नेमाजी शिंदे यांनी आपल्या सैन्यासह माळवा व आसपासचा प्रदेश ताब्यात घेण्यास सुरुवात केली होती. मोगलांची सत्ता खिळखिळी करण्याचे धाडस प्रथम नेमाजी शिंदे यांनीच केले. इ.स.१७०४मधील नेमाजी यांच्या नेतृत्वाखाली उत्तरेत मराठ्यांनी फार मोठी जंगी मोहीम उघडली होती.

या मोहिमेला ऐतिहासिकदृष्ट्या फारच महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनाच्या आमिषाने मोगलांकडे जाणाऱ्या सरदारांसाठी वतनव्यवस्थाच मोडीत काढली. पुढे तीच पद्धत छत्रपती संभाजी महाराजांनी पुढे चालू ठेवली. तरीही स्वार्थी सरदार मोगलांकडे जाऊन वतने स्वीकारू लागले. छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर मराठा साम्राज्य संपते की काय अशीच परिस्थिती निर्माण झाली; परंतु या सर्व बिकट परिस्थितीवर मात करून छत्रपती राजाराम महाराजांनी स्वराज्याची सूत्रे आपल्या हातात घेतली. छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या मुत्सद्दीपणाने जिंजी येथे राजधानी थाटली व तिथून स्वराज्याची सूत्रे हलविण्यास सुरुवात केली. या धामधुमीच्या काळात मराठा सरदारांना रोखणे आवश्यक होते. स्वराज्य सोडून सरदारांनी जाऊ नये, म्हणून त्यांना पायबंद घालणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी एक शक्कल लढवली. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेले नियम न मोडता छत्रपती राजाराम महाराजांनी खूप छान नियम घालून दिला. तो नियम असा की, शत्रूच्या प्रदेशात असलेला एखादा भाग वतन म्हणून द्यायचा. ज्या सरदाराचे नावे ते वतन दिले जायचे तो भाग किंवा प्रदेश जिंकून घ्यावयाचा व त्या प्रदेशाची जबाबदारी त्या सरदारांची असायची. यासाठी त्या वतनदारानी फौज गोळा करून तो प्रदेश जिंकून तिथे आपले प्रशासन निर्माण करावयाचे. जिंकलेल्या भागातील वसुलीचा काही हिस्सा स्वराज्यात भरावयाचा व उरलेल्या रकमेतून आपले सैन्य उभे करावयाचे. स्वराज्याकडून आज्ञा येईल, तेव्हा त्यांच्या मदतीला जावयाचे.

आपल्या प्रदेशातील, वतनातील सर्व जबाबदारी, व्यवस्था त्या वतनदाराकडे असायची. अशा पद्धतीने छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सरदारांना वतने देऊन शत्रूचा प्रदेश आपल्या सत्तेखाली आणला. याच धोरणानुसार छत्रपती शाहू महाराजांनी राणोजी शिंदे यांना माळव्यातील सरंजाम दिला. राणोजी शिंदे यांनी माळव्यात चांगला जम बसवला. राणोजी शिंदे यांचे वतन म्हणजे मराठा दौलतीचे उत्तरेकडील शेवटचे टोक होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीपासून शिंदे घराण्यातील पुरुषांचा उल्लेख आढळून येतो. जुन्या बखरी व जुनी कागदपत्रे यात शिंदे यांचा उल्लेख आढळून येतो. त्यावरून हे घराणे मराठेशाहीच्या अगदी आरंभापासून अस्तित्वात आहे, असे म्हणता येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरी नेमाजी शिंदे या नावाचे एक प्रबळ व पराक्रमी सुभेदार होते. स्वराज्यस्थापनेच्या वेळी नेमाजी शिंदे यांचे चांगले सहकार्य झाले होते.

थोरले शाहू महाराजांच्या कारकिर्दीतील राजकारणात नेमाजी शिंदे यांचा उल्लेख वेळोवेळी वाचावयास मिळतो. यावरून असे लक्षात येते की, नेमाजी शिंदे समरभूमीवर बरीच वर्षं चमकत असावेत. थोरले छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीत स्वराज्यरक्षण प्रसंगी नरसोजी व जिवाजी शिंदे तोरगलकर यांचीही नावे येतात. यावरून शिंदे घराणे हे पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

औरंगजेबाने थोरले छत्रपती शाहू महाराज यांचे लग्न कण्हेरखेडच्या शिंदे सरदार यांच्या मुलीशी १७०६मध्ये लावून दिले, ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या भोसले क्षत्रियकुलावतंस व सर्वश्रेष्ठ महाराष्ट्रकुलाशी ज्या घराण्याचा शरीरसंबंध जोडला होता, ते घराणे तोडीस तोड असणार यात शंकाच नाही. शिंदे सरदारांची मुलगी थोरल्या शाहूंना दिल्या होत्या. त्यांचे नाव सावित्रीबाई होते. इ.स.१७१०मध्ये सावित्रीबाई यांचे निधन झाले.

शिवकालानंतर मराठ्यांच्या इतिहासातील रणांगणावरची सर्वोच्च पराक्रमाची शर्थ म्हणून पानिपतच्या लढ्याकडे पाहिले जाते. या सर्व धामधुमीच्या कालखंडात ज्या मराठा सरदारांनी आपल्या शौर्याची शिकस्त केली, त्यात शिंदे घराणे प्रथम स्थानावर होते.

पानिपतावर गेलेली पत परत आणण्याचे मोठे कार्य शिंदे व होळकर यांनी केले. त्यामुळे शिंदे, होळकर यांचा इतिहास भव्य आणि उत्तुंग आहे, असेच मानावे लागेल. शेकडो वर्षांच्या जुलमी मोगलशाही राजवटीविरुद्ध छत्रपती शिवरायांनी उभारलेला संघर्ष मराठी माणसाला आणि महाराष्ट्राला एक वेगळीच दिशा देऊन गेला. मराठ्यांची अस्मिता आणि अस्तित्व नेमके काय आहे, याचे मूर्तिमंत उदाहरण द्यायचे झाले, तर आपल्याला मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध आणि तो कालखंड आठवावा लागेल. छत्रपती शंभूराजांच्या बलिदानानंतरचा कालखंड पाहिला तर, मराठ्यांच्या हिमतीला आणि पराक्रमाला दाद द्यावी लागेल. औरंगजेबाला मराठ्यांचे राज्य मिळविण्यासाठी सतत सत्तावीस वर्षे प्रचंड झगडावे लागले; परंतु तरीही त्याला त्यात यश मिळाले नाही. शेवटी मराठ्यांनी त्याला इथल्याच मातीत गाडला. इतिहासातील हा अत्यंत महत्त्वाचा कालखंड होता; कारण स्वराज्यावर चारही बाजूने संकटे घोंघावत होती. स्वराज्यातील अतिमहत्त्वाच्या व्यक्ती शत्रूच्या ताब्यात होत्या. राज्य आर्थिक अडचणीत होते. सैन्याची पुरेशी कुमकही नव्हती. अशा वेळेस छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराराणी साहेब यांच्याबरोबर संताजी घोरपडे, धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, रामचंद्रपंत अमात्य आणि स्वराज्याचे अनेक सरदार, शिलेदार स्वराज्याच्या कामात आघाडीवर होते. निजामाचे राज्य, औरंगजेबाचा मुलूख या पराक्रमी सेनानींनी पादाक्रांत केला व महाराष्ट्राबाहेर मराठ्यांची ओळख निर्माण केली. नर्मदेपलीकडे माळव्यावर स्वारी करून सन १७०० ते १७०७ या कालखंडामध्ये नेमाजी शिंदे यांनी यशस्वी घोडदौड केली. हाच धागा पुढे धरून मराठी सैन्य हिंदुस्थान आणि बाहेरील सीमांवर आपली विजयपताका फडकवण्यात यशस्वी झाले.

पहिल्या बाजीरावाने राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, तुकोजी पवार, साबाजी शिंदे यांना बरोबर घेऊन दिल्लीवर स्वारी केली आणि मराठी बाणा दाखवण्यात हे सेनाबहाद्दर कोठेही कमी पडले नाहीत. १७५२नंतर बलाढ्य सत्ताधीश म्हणून मराठे हिंदुस्थानात गणले गेले. याच कालखंडात दिल्लीचे राजकारण विकोपाला गेले. ही नामी संधी मराठ्यांनी अजिबात सोडली नाही. आपले वर्चस्व वाढवून जयाप्पा शिंदे यांनी अहमदिया करार करून दिल्ली दरबारच्या राजकारणात प्रवेश केला.

उत्तरेतील अनेक सत्ताधीशांना या राजकीय घडामोडीचा हेवा वाटू लागला; परंतु मराठ्यांविरुद्ध आवाज काढण्याची कोणाची हिंमत नव्हती. खुद्द हिंदुस्थानच्या बादशहानेच मराठ्यांचे वर्चस्व मान्य करून मदतीची याचना केली होती. मोगलांच्या २२ सुभ्यांवर मराठ्यांनी राज्य केले. हिंदुस्थानच्या बाहेर जाऊनही मराठ्यांनी सत्ता काबीज केल्या. भीम पराक्रम करून अटक, रोहतास, बाला, हिस्सार, जमरुद हे किल्ले मिळवून मोठाच पराक्रम केला.

दिल्लीचा सत्ताधीश कोण हे महाराष्ट्रातून मराठे ठरवत होते. निजाम मराठ्यांना घाबरून सलगीने राहत होता. मराठ्यांच्या शेजारील प्रत्येक राज्य मराठ्यांशी युद्ध होऊ नये म्हणून काळजी घेत होते. पानिपतवर विजय मिळाल्यावरसुद्धा अब्दाली मराठ्यांना घाबरून होता. दिल्लीची जबाबदारी मराठ्यांनी घ्यावी, असे अब्दालीने सूचित केले होते. १७६१नंतर उत्तर भारतातील अनेक सत्ताधीश महाराजा महादजी शिंदे यांचे नेतृत्व मानू लागले होते. दिल्लीपतीने महादजी शिंदे यांच्या पराक्रमावर खूश होऊन अखंड महाराजाधिराज 'वकील- ए- मुतल्लक' अशी पदवी देऊन हिंदुस्थानचा राज्यकारभार त्यांच्यावर सोपवला. हा मराठा साम्राज्याचा फार मोठा सन्मान होता.


'राजपाठ सब त्याजके आये तुम्हारे बस । अब ऐसी किज्यो महादो की होवे तमरी जस।' अशी काव्यमय विनवणी करून खुद्द दिल्लीपती बादशहाने महादजी शिंदे यांच्यावर हिंदुस्थानचा कारभार सोपवला. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा पाया घातला आणि दिल्ली जिंकून महाराजा महादजी शिंदे यांनी त्यावर कळस चढवला आणि या देशावर, दिल्लीवर राज्य करण्याची कुवत फक्त मराठ्यांमध्येच आहे, हे दाखवून दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कष्टाने उभारलेले हिंदवी स्वराज्य छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणी यांनी प्राणपणाने जपले, वाढवले आणि मराठी सेनानींच्या सहकार्याने अटकेपार पोहोचवले. नेमाजी शिंदे, माणकोजी शिंदे, जयाप्पा शिंदे, साबाजी शिंदे, दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, बयाजी शिंदे, जिवाजी शिंदे, संभाजी शिंदे, तुकोजी शिंदे, मानाजी शिंदे या सर्व शिंदे कुटुंबीयांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन शिंदे घराण्याची पराक्रमी परंपरा कायम राखली. श्रीमंत

महादजी शिंदे यांनी एक नवा इतिहास रचून अखंड हिंदुस्थानात मराठ्यांचा आणि शिंदे घराण्याचा नावलौकिक वाढवला. महादजी शिंदे यांच्या पराक्रमामुळे मराठ्यांचा दबदबा हिंदुस्थानातच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडात निर्माण झाला. महादजी शिंदे यांच्या कणखर नेतृत्वामुळे इंग्रजांचेसुद्धा मराठ्यांशी थेट वैर पत्करण्याचे धाडस झाले नाही. महादजी शिंदे यांनी संपूर्ण दिल्ली दरबार आपल्या अधिकारात घेण्याचा इंग्रजांचा डाव हाणून पाडला. म्हणूनच महादजींनी 'द ग्रेट मराठा' ही पदवी सार्थ ठरवली. पहिल्या इंग्रज–मराठा युद्धात इंग्रजांना धूळ चारून या वीराने मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. इतिहासातील पराक्रमी शिंदे घराण्याने गाजवलेले शौर्य व कामगिरी अभिमानास्पद अशीच आहे.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## चांदणफुला

**सुमेध वडावाला(रिसबूड)**

पृष्ठे : १८०
किंमत : २७०

*आशयघन कथानक आणि आकर्षक कथनशैलीतील सुमेध रिसबूड यांच्या कथा दशकांच्या अंतराने पुन्हा वाचकांच्या भेटीस*

### बाजार

पाहावं, तिकडे हिरव्याकंच झाडीचे धुमारे; अस्ताव्यस्त, सांबरशिंगांसारखे. आभाळात काळ्या ढगांचे खडक. मध्येच निळ्यावाभऱ्या पङ्ख्यांच्या लांबोळ्या दऱ्या. भुईच्या आरशातही तेच अस्ताव्यस्त

प्रतिबिंब. दगडी. निसरड्या धोंडी. गुरांच्या हिरवट शेणांचे पो. पाणलोट आणि चिखलात हरवून गेलेली पाऊलवाट...

पावसाळी दिवसांत चिखल थपथपतो, म्हणून पायांत चपला नाहीत. खोतांकडे सवाष्ण म्हणून बोलावलीय, म्हणून हाती ओवळ्याची छत्री नाही. अर्थात हा पावसाळा नसता, 'सवाष्णपणा'च्या मानलेण्याचं निमंत्रण नसतं, तरी चपला काय, किंवा छत्री काय! कधी साताठ वर्षांपूर्वी चांभाराशी हुज्जत घालून थोडक्यात बांधवून घेतलेल्या, नंतर वर्षांच्या ओझ्यांनी कडकडीत झालेल्या चपला. कधी प्रसंगाने कुठे जायचं असलं, तर ओटीच्या वाशावरून काढून, पहिल्यांदा पाण्यात बुडवून नरम करायच्या. आणि छत्रीही एकच. ती वत्सलेने शाळेत नेलेली. माईंनी वर्षानुवर्षं जिवापाड जपलेली. तरीही काळाच्या खुणा उमटल्याच, जशा त्या माईंच्या कुडीवरही उमटल्या होत्या.

पाठीस पोक. दातांचा पोबारा आणि पायांत यथातथा बळ. जुनेरं सोवळं. रेशीमवस्त्रावर विरल्याचा कशिदा जागोजाग. हातांत सोन्याची एकेक झिजट बांगडी. पुढे हिरवा चुडा. आत सरकावला, तर कोपरातून दंडावर जाईल. बाजूबंदासारखा न बसता खाली घरंगळेल. नाकपुडीला लोंबकळणारी नथ. तीही उतरलेल्या पाण्याच्या मोत्यांची. झिजून सैल झालेल्या फिरकीची. कानांच्या झुलत्या पाळ्यांतल्या कुड्याही तशाच. झुलणाऱ्या.

पायवाटेवरून झुलल्यासारख्या, निसरडे दगड, शेण चुकवीत माई खोतांच्या घराशी आल्या. ओटीवर अनसूया नव्हती. पण आतून गलका झाला,

'थांबा, थांबा, होऽऽऽ,' चा...

चारदोघी आत पळाल्या. आरतीच्या तयारीस.

आजचा मान काही वेगळाच. अलभ्यही.

पायरीवरच पायांवर वाफाळतं पाणी. वर खसखशीत पंचा. अनसूयेच्या गुबगुबीत बोटांनी हळदीकुंकू. निरांजनाची तबक-ओवाळणी. डोईवर अक्षतपेरणी आणि पायांवर केशरी दुधाचा पाट. तो पायऱ्यांवरून उतरला आणि चिखलमातीत मिसळला. वेडावाकडा.

''या, हो, माई, आता आत कशा,'' अनसूया म्हणाली.

माई भांबावल्या.

ओटीचे दर्शनी, शिसवी गज. नितळ भुई. तिच्यावर चुन्याच्या देखण्या रांगोळ्या. पडवी. उंचावर ओटी. ओटीच्या कोपऱ्यात सागवानी हडपे. पितळी कुलपाकड्यांचे. भिंतीशी गाद्यागिरद्या. पांढऱ्या स्वच्छ. लोडांपुढे बसक्या चौपाया. दवतीटाकांचा थाटमाट. लखलखीत समया. अर्ध्यापुरुष उंचीच्या. भरभक्कम पोटांतल्या दहा-दहा वातींच्या. दोन हातांशी दोन दिवाणजी. मध्ये खोत. स्वतः वयाने पिकले. पण...

खोतांची घारी नजर उंचावली. दारात माईंवर खिळली. थोडीशी ओळख दाखवणारी, पण जरबेची.

खोत पुसट हसले.

माई ओशाळल्या. भांबावल्या.

कधी ही चौखणी बेताची पडवी, ओटी पार करतो, दिवाणखान्यात जातो आपण.

माईंच्या लटपटत्या पायांत त्वरा मिसळली. एरवी अनसूयेकडे येणं, नित्याचं येणं, ते मधला गडगा ओलांडून. तिच्या ताकाच्या हाकेला. आषाढात एकदम दहा-बारा जाफराबादी पाडश्या राहिल्या, की निरशा दुधाची चरवी न्यायला. किंवा तिचं मेतकूट, तांदूळपीठ दळायला. पण कधी असं दबकायला व्हायचं नाही. श्वास कोंडायचा नाही. आजच्या थाटाने माई उबल्या. लगबगीने दिवाणखान्यात आल्या.

दिवाणखान्यात बिलोरी झुंबरं, विलायती रंगीत मेणबत्त्यांची. काचेच्या हंड्यांची. अर्ध्या भिंतीएवढा चकचकीत आरसा. पुढ्यात रुईच्या कापसाची बिछायत. वर चांदीचा पाळणा. देवीपुढे कोवळ्या काकडीचे काप. तेरड्याची फुलं. हजारमोगऱ्याचं मखर. कृष्णकमळांचा डोंगर. हिरव्या चाफ्याची दरवळ. मखराच्या मांडवाला पडवळांच्या वाती. भोपळ्याची फुलं. पुढ्यात झाड घुमणारं, धूपाच्या लोटांत,

''हुंः हुंः हुंः हुंःऽऽ''

बाजूस अनसूया. घाबरीघुबरी. पदर पसरून,

''तृप्त हो, गे, माय. तृप्त हो...''

''हुंः हुंः हुंः हुंःऽऽ''

दिवाणखान्यातली जमीन बोटांनी सारवलेली. सारवणातल्या जळक्या

पेंढ्याने काळीशार. वर मऊ गादीच जसा जाजम. जाजमावर अल्याड पल्याड बायका, जत्रेसारख्या खच्चून भरलेल्या...

''देवी सोन्याने । मढविली... मढविली...''

''देवी हिऱ्यांनी । वाकली, वाकऽऽली...''

''शोभे डिंळबी । पैठणी, पैठऽऽणी''

''देवी भुलली, गऽऽ । भुलली या श्रावणीऽऽणी!!''

अल्याडच्या मेळ्याचा एक उखाणा, तर पल्याडच्यांचा दुसरा. वरचढ... त्याने झाड फोफावलं. हुंकार वाढले.

अनसूयेच्या चारी लेकी. माहेरपणाच्या. बरोबर किरकिरी नातवंडं. मखमली कपडे. नखशिखांत बाळलेण्यांनी सजविलेली, तरीही पाप्याची पितरं. वच्छीस धड दुपटंही नव्हतं, म्हणून जुन्या धोतरांचे तुकडे, धावदोऱ्याने शिवले होते. आणि पुरेसं दूध नाही, उकाडा वाढवायचा नाही, म्हणून गुरगुट्या भाताचे रतीब लावले होते. सकाळ-संध्याकाळ. तरी बाळसं म्हणजे काय? हत्तीचं पिलू. आपलीच दृष्ट लागावी, असं. माईंना आठवलं. फार वर्षांपूर्वीचं...

अनसूयेचं नातवंडं बेंबीपासून किंचाळलं, माईंनी हात पुढे केले. म्हणाल्या,

''आण, गो, इकडे त्यास...''

''नको, मुतलं आहे.''

कुळवाडीण पुढे झाली. नातवंडास घेतलं. जोजवीत पाठल्या पडवीकडे गेली.

कोपऱ्यातली गॅसबत्ती एकाएकी फसफसली.

मुनीमजी ओटीवरून आले. पंप मारला. तरी तशीच. डोळे वटारून धुसफुसत राहिली. त्या झाडासारखी. झाडाच्या भोवती बायांचं कोंडाळं. उत्साहाचं उधाण. भजनाचा रेंगाळलेला स्वर. देवीची गाणी थंडावलेली. उखाण्यांचं पेव फुटलेलं. नवऱ्यांची नावं खणखणणारी. तरी झाड सुटेना. अनसूया उठेना.

मग मोठ्या लेकीने सामान आणलं. ओट्यांचं. खाण्यांचं. पांढऱ्या मोडांचे टप्पोरे हरभरे, पोफळं. श्रीफळं. हिरवे खण. दक्षिणेचे बंदे रुपये.

वर चार आणे. वेलचीची खिरापत. बदामाचा सांजा. भाजणीचे गरम वडे. वर पाघळणारे लोण्याचे गोळे. जायफळाची कॉफी. कुवारल्यांना परकर-पोलक्यांची कापडं, चांगल्या चिटांची भारी, पक्क्या रंगांची.

''अग्गो बाई, या कुवारल्यांच्यांत माईंची वच्छी कशी नाही, हो?'' कुणी तरी बोलली.

''ठाऊक नाही, वाटतं?''

''काय ते मेलं?''

''इश्श. कुवारली का ऱ्हायल्ये आता ती?''

''तर मग?''

''न्हाण नाही का आलं तीस?'' परस्पर तिसरीच कोणी. आंबाड्याच्या डेऱ्यावर हात रापीत म्हणाली.

घुमणारं झाड हलकेच उतरलं, माथं भुईस भिडलं.

अनसूया उठली. भरल्या गोकुळाकडे, वैभवाकडे अधिकारी नजरेने पाहत.

माई थिजून, कोपऱ्यातल्या पाटावर. ओटीची वाट पाहत.

डोळ्यांपुढे नऊवारी. कुसुंबी असेल की मळखाऊ वायंगी? काठापदरांची. कोऱ्याकरकरीत घडीची. छापील नक्षीची असेल, की अंगभर रंगाची?

चौफेर बायांचे घोळके. ओट्यांची गाठोडी. लेकीबाळींना हाकारे.

''कापडं आणून द्या, गो, आम्हाजवळ. नायतर पाडाल चिखलातून जाताना.''

कुणाला तो विषय आठवला. मघाचा. वच्छीचा. कुवारल्यांच्या कापडांवरून.

''आक्का, वच्छीस न्हाण आलं, नि तिच्या बापसाने...''

''समजलं वाटतं तुम्हाससुद्धा?''

''तर काय? जसा काय टपलाच होता, हो, कसायासारखा.''

''अगं, पण कोण? कुठला? कुणाच्या कुळांतला?''

''शूऽऽऽ'' कुणी तरी दटावलं. कोपऱ्यातल्या माईंकडे चोरट्या नजरेने पाहून.

''इश्श, लपवायचं ते काय? दापोलच्या अवधूत बाळांकडे जमविलं,''

कुणी पाठमोरी महामाया म्हणाली.

‘‘तुला, गो, कसं कळलं बित्तंबातमीचं?’’

‘‘सुनेस आषाढी माहेरी धाडली, तो पालगडभर हीच वदंता.’’

पुन्हा हास्याच्या लाटा. कुचाळक्यांच्या सरीवर सरी.

माईंच्या डोळ्यांत मेघ. छातीच्या पिंजऱ्यातत गडगडाट, धपधपत्या ठोक्यांचा.

ओटीवर ठणठणाट. कागदपत्रांवरचे शिशाचे ठोकळे. चौपायांवर आदळले. आवर्तनांसारखे घुमले. कुणाचंच ध्यान नव्हतं.

‘‘आता बैस, म्हणावं, महाराणीच्या थाटांत आयुष्यभर.’’

‘‘पण तंवसर महाराजांनी टिकाव धरावा. नाही तर आजीआधीच व्हायचं कपाळ पांढरं नातीचं.’’

‘‘म्हणजे, गो, शिंच्ये?’’

‘‘जरत्कारू, गो, बाई, जरत्कारू...’’

‘‘काय?’’

‘‘सांगितलं तेच. जरत्कारू, हो, बाळांचे कुलदीपक.’’

हास्यांचं पेव फुटलं. बायांनी तोंडं झाकली. पदरांत, ओंजळीत, लांब हातांच्या कोयताडांखाली. हसता हसता दमछाक झाली.

‘जरत्कारू, गो, बाई, जरत्कारू.’

’जरत्कारू, गो, बाई, जरत्कारू.’

हवेत विरलेले शब्द माईंच्या मेंदूवर अदृश्यपणे घण घालू लागले.

‘आई अंबे, सांभाळ, गो, वत्सलेस,’ माईंच्या आतड्यातून ओठांवर शब्दांची पुटं चढली. मनाच्या गाभ्यात घुमली. चिंतेची झाकोळी दाटली.

हास्याचे फवारे. टाळ्यांचे पिटारे. उसळणारं दुखरं पोट पकडण्यासाठी तोंडावरचा हात खाली ओढताना कुणाचं तरी कुंकू फरफटलं. कपाळभर पसरलं.

माईंना तो अपशकुन वाटला. फारच मोठा. आणि ती कुजबुज जोडीला.

दिवाणजी आले. उंबऱ्यातून झुकले. म्हणाले,

‘‘बाहेर खोत चिडलेत. ‘काय मासळीबाजार मांडलाय कोळणींसारखा?’ म्हणालेत.’’

गलका थंडावला. चिडीचूप झाला.

अनसूयेने माईंची ओटी भरली.

काबुली चणे. बत्तासे. साखरफुटाणे. जिरेसाळीचे तांदूळ. पंढरपुरी पिंजर. शेतावरली राजापुरी हळद. जरीकाठी पातळ. वरच्या हिरव्याकंच मोराचं. चोळीचं कापडही तसलंच. भरजरी. तलम.

डोळे सुखावले. घडीस दिपले. पण वय बोललं,

''अन्सये, मला कशास मेलीला ही असली नव्वारी? मोराची नि फिराची.''

''फिरायचीच आहे, माई. कधीमधी वच्छीससुद्धा होईल उप्वेगाला नेसायच्या, बाहेर जाताना,'' खणाखणा नमस्कार करीत अनसूया म्हणाली.

''वच्छी कसली नेसत्ये? नव्वारी? हंऽऽऽ'' कुणी तरी टोचलं.

''का, गो? का नाही?''

''मड्डम व्हायचंय ना तीस शाळेस जाऊन?'' कुणी तरी उत्तरलं.

हास्याचे मळे पिकले.

माईंच्या काळजात सललं. ऊर धपापले.

''हो, हो. मड्डमच करीन, हो, तीस. तुमच्या बापसांचं काय जातं त्यात?''

''आमच्या बापसांचं काय जातं? जाईल, ते तिच्या बापसाचं. पालगडी कूळ भ्रष्ट होईल, ते त्याचं.''

''त्याचं होऊ दे कूळ भ्रष्ट. तुमचं नतद्रष्टपण पुरे झालं. गिळा मूग आता.''

पुन्हा साळकाया फिसकल्या.

माईंना भरून आलं.

बाहेरून ठणठणाट झाला. शिशाच्या ठोकळ्यांचा.

''पुरे, हो, बायांनो, आता तुमचं,'' अनसूयेने रदबदली केली.

माई ओटी पदरात बांधत होत्या, त्यांना पिशवी दिली. म्हणाली,

''हिच्यांत ठेवा सगळं. नि पिशवी परत नका, हो, पाठवू.''

माई ओशाळल्या. उठल्या.

''येत्ये, हो, अन्सये,'' म्हणाल्या.

ओटी उतरल्या. पडवीतून पायऱ्यांवर आल्या...

पायऱ्यांवर अजूनही दुधाचे ओहोळ वाहत होते. केशरी झाकेचे.

अन्सयेच्या घरात गोकुळ. दुधाचा नास. शेजारच्या आवारात आपलं घर. तिथे टिपूसही महाग. सोन्याची द्वारका आणि सुदाम्याचं गाव जवळजवळ वसल्यासारखं. बैलाच्या एका शिंगावरून पाऊस जाऊन दुसरं कोरडं राहिल्यासारखं हे. माईंना वाटलं.

पायऱ्या उतरून, खोतांचं अंगण ओलांडून त्यांनी आभाळाकडे पाहिलं.

आभाळ श्रावणाने ओथंबलेलं. अवचित सांजोळी उन्हाने झगमगून उठणारं. घराच्या दारापुढली तुळस वाऱ्याच्या झोतांनी लहरणारी. वृंदावनाभोवती अंगणभर पाणखड्डे. पावसाच्या तिरक्या टिचक्यांनी थरथरणारे.

''चारी दरवाजे लावा, गं, बाई,

लावा, गं, बाई...

झिपऱ्या कुत्र्याला सोडा, गं, बाई.

सोडा, गं, बाई...''

इनामदारांकडल्या हळदीकुंकवाची गाणी पावसाबरोबर थरकत येणारी. माईंच्या घरापर्यंत.

'जरत्कारू गो, बाई, जरत्कारू.'

'जरत्कारू गो, बाई, जरत्कारू.'

माईंच्या कानांत आवाज घुमले.

मेटाकुटीस येऊन माईंनी कानांवर हात ठेवले.

मग हळूहळू अंगण पार केलं. आपला उंबरा कसाबसा ओलांडला. वेडंवाकडं पाऊल पडलं. वायनात अडखळलं. कटकन मुरगळलं.

''अयाय. मेल्ये, गो, बाई. मेल्येऽऽ,'' माई किंचाळल्या.

समोरच्या माच्यावर अप्पा बसलेले. मातीच्या ठिगळखोर भिंतीला टेकून टेकून घाम आलेला. गिलाव्यातली भाताची तुसं पाठीस टुपणारी.

माच्यावरच उशागती ठेवलेला पंचा अप्पांनी उचलला. पाठ खराखरा घासली. मग जानवंही सरासरा ओढलं.

''सुऽऽस...'' पंचा उगाच हवेत फिरवला. मान उलटी वळवून भिंतीच्या

माथ्याकडे पाहिलं.

सारंच ओल पाझरलेलं. उघडी मापं. दैन्याच्या देखाव्याचे खाली कोनाडे, जागोजाग.

मटकन वायनापाशी बसलेल्या माई, तशाच बसून होत्या. पाय कुरवाळीत बसल्या होत्या. त्यांच्या कळा अप्पांनी दुर्लक्षिल्या होत्या.

हे नेहमीचंच असलं, तरी त्या सूक्ष्म सलाचा संताप डोळ्यांतून पाघळला.

''अयाय् गोऽऽ...'' त्या चीत्कारल्या.

अप्पांनी टिनाच्या काळ्या गोल डबीतून विडी काढली. काडी शिलगावली. विडी पेटवली. धुराची धुरवळ थेट आढ्यापर्यंत गेली.

''जल्म गेला त्या माच्यावर नि विड्यांच्या बंडलात. कोण मेलं वा मरू घातलं, करायचंय, काय त्याचं?''

''धुण्याची काठी देऊ हाताशी? धरून उठता येईल मग,'' अप्पा गदगदून हसत म्हणाले. कुजकटपणे.

''दात कशास दाखविता? पोटशूळ होईल अशाने,'' माई फणकारल्या.

''मग तर ओवा देण्यास उठावंच लागेल तुम्हास. म्हणूनच काठीचं पुसलं.''

विजयी, वरचढ भावनेने अप्पांनी पुढे खोट्या मायेने विचारलं,

''देऊ ना काठी?''

''कशाला? तिरडीसाठी ठेवा माझ्या ती. द्यायचा, तो खांदाच द्या थेट मयताला माझ्या. मडकंही सोधून ठेवा.''

''सोधण्यास नको. बापजाद्यांनी तितुकंच ठेवलं. माळ्यावर रिती गाडगी बक्कळ पडलीत,'' खोलवर तृप्त झुरका घेऊन अप्पा म्हणाले.

पायभरची वेदना माईंनी पचवली. दैवाला शिव्या वाहत उठल्या. लचकत आत गेल्या.

देवाच्या निरांजनाची वेळ जवळ येत होती, म्हणून वात काढली.

''ऐकलंत का आणि...'' अप्पांनी माच्यावरून विचारलं.

''काय ते, बाई?''

''राघवाचं मुंबैहून पत्र आलं, तुम्ही खोतांकडे गेल्यावर.''

माईंनी वात तुपातच सोडली. अधीरपणे ओटीवर आल्या. म्हणाल्या,

‘‘काय लिहिलं, हो, राघवाने?’’

‘‘गणपतीस येतो, लिहिलं.’’

‘‘किती दिसांचा?’’

‘‘लिहिलं नाही, म्हणजे नेहमीचं असावं. दीड दिसाचा गणपती बुरमुण्यांत बुडविला, की आमचेही गणोबा चालले मुंबैत बुडायला रातराणीने.’’

‘‘आणि काही लिहिलं?’’

‘‘कोणाच्या संबंधाने?’’

‘‘वत्सलेच्या वह्यापुस्तकांचं? कंपासपेटीचा तगादा मास्तरांनी लावला. तीही सामाई परीक्षेच्या आधी हवी.’’

अप्पा गडद हसले. धुरांवर धुराचे लोट सुटले.

ओटीच्या अंधारचौकटीत विडीची जळती ठिणगी उठून फुलली. लालबुंद प्रकाशाच्या क्षीण तेजोमयीतही अप्पांच्या बोळक्या तोंडाभोवतीचं सुरकुत्यांचं जाळं आणि बोटांची लांबसडक हाडं स्पष्ट दिसली.

राख झटकण्यासाठी तर्जनीने विडीवर हलकी टिचकी मारून अप्पांनी पुन्हा धूर भगभगवला. खदाखदा हसले.

‘‘काय हे विपरीत, बाई? मी विचारले पोरीच्या बुकांचं. कंपासपेटीचं...’’

‘‘समजलं मला ते.’’

‘‘मग? काय झालं त्याचं?’’

‘‘या चिजा आणणेविषयी, राघवास धाडलेल्या पत्रांत मी लिहिलंच नव्हतं.’’

‘‘काय हे नाठाळपण, बाई? काय म्हणू या दुर्बुद्धीस?’’

‘‘सुबुद्धी, सुविचार म्हणा. विवेक म्हणा, हवं तर.’’

‘‘मी तिला आठवण केली होती ना, ते लिहिण्याची?’’

‘‘आठवण मलाही होतीच; पण जाणूनबुजून लिहिलं नव्हतं.’’

‘‘का त्या पोरीस छळता तुम्ही? पोरकी, म्हणून?’’

‘‘कुठलं, कुणाचं पोर? आपलीच पोटं या गोठ्यांत जड झाली असताना दुसऱ्याचं ढोर आणून दावणीस लावणाऱ्या त्या तुम्हीच. मी नव्हे. पालगडास मी सोडण्यास निघालो असता मस रोखणाऱ्या तुम्हीच त्या...’’

‘‘आणि हे गोदूचंच पोर असतं, तर?’’

‘‘तेव्हा पाह्यलं असतं,’’ नानांच्या कपाळी आठ्या चढल्या.

पागोळीखाली छत्री वाजली, तशी माई आत वळल्या. त्वेषाने.

‘अंबा पिकतो,

रस गळतो...

कोकणचा राजा,

झिम्मा खेळतो...’

खोतांकडले स्वर दाट झाले होते.

वत्सला धावत माईंपाशी आली.

परकर अर्धा भिजून लोळागोळा झालेला. छत्रीच्या फाटक्या मध्यातून तांबूस कुरळ्या केसांच्या महिरपीवर फवारलेले पाणिंबदू, मोत्यांसारखे. आणि घट्ट पोलक्यात ठळक होत जाणारी दोन टिंबं...

माईंच्या मनात निर्दयी आषाढ कोसळला. चिंतेचा. भविष्याचा.

हिला आता नव्या वाढीचे कपडे करायला हवेत. जमलं, तर नऊवारीची जोडी. झंपर, चोळ्या.

पाय धुऊन वत्सला माईंपुढ्यात आली.

‘‘कार्ट्ये, कित्तींदा सांगितलं. परकराचा काचा मारावा. पायपुसण्यास पाय पुसून यावं,’’ तिच्या ओल्या पाऊलठशांकडे पाहत माई रागाने म्हणाल्या. मग कौतुकाने विचारलं,

‘‘खाऊ हवा ना, गो? ते बघ, फडताळांत काय ठेवलंय जर्मलीच्या वाटीत.’’

उंबऱ्यातच टाकलेलं दप्तर वत्सलेने खुंटीस अडकवलं.

फडताळातली वाटी काढली. आतले बत्तासे, काबुली चणे खात तिने माईंना गळामिठी घातली. अंगावर ओथंबली. म्हणाली,

‘‘माई, माई, मी खोतांकडे जाऊ?’’

‘‘कशास, गो, रांडच्ये?’’

‘‘हळदीकुंकवास.’’

‘‘बोलावणं तरी आहे का, तूस?’’

‘‘होऽऽऽ’’

‘‘कुणी केलं, गो? खोतांच्या जाफ्राबादी म्हशीने?’’

''अन्सयावैनींनी केलं. म्हणाल्या, तूस वेगळं सांगत्ये, नाय, तर माई आणायच्याच नाईत तुला.''

''जा मग शेण खायला.''

''खरंच ना? जाऊ मी, माई?''

माईंनी तिची मिठी झटक्यात सोडवली. तिला दूर हाकलत विचारलं,

''काय? वाटुळं करून घ्यायचंय, वाटतं, आयुष्याचं?''

''......''

''आता कंच्याही कारणाने खोतांकडलं तुझं जाणं बंद, हे कैकदा सांगून झालं ना, गो?''

हिरमुसल्या तोंडाने वत्सला पाठच्या पडवीत पळाली.

माईंनी चिमणीत घासलेट भरलं. कंदिलाची काच राखेने लखलखीत केली. वातीचं किोंळजन कुसकरून उडविलं. देवांपुढे निरांजन लावलं. हळदिंपजरेचे ठिपके सोडले. लामणदिवा लावला. ओटीवर आणला. चौफेर फिरवून उंबऱ्यापाशी आल्या. तुळशीवृंदावनाच्या दिशेकडे वेळावला. तोंडात करुणाष्टकं,

''तुजविण करुणा हे । कोण जाणेल माझी?
सिणत सिणत पोटी । पाहिली आस तुझी ।।
झडकरि झड घाली । धांव, पंचानना, रे ।
तुजविण मज नेती । जंबुकी वासना, रेऽऽ।।''

स्वयंपाकघराकडे वळल्या. वळताना क्षणभर थबकल्या.

माच्यावर नाना घोरत निद्रिस्त पडले होते. चेहरा त्या पंच्याने झाकलेला. खपाटीस गेलेलं पोट झपाझपा वर-खाली होणारं.

''तिनसांजेची अभद्र लक्षणं मेली,'' माई म्हणाल्या. कपाळभर आठ्या पसरल्या. नंतर पुढचं करुणाष्टक,

''सबळ जनक माझा । राम लावण्यकोटी ।
म्हणवुनि मज पोटी । लागली आस मोठी ।।
दिवस गणित बोटी । ठेवुनि प्राणी कंठी ।
अवचित मज भेटी । होत घालीन मिठी ।।''

देवांच्या कोनाड्यात माईंनी दिवा ठेवला. स्वयंपाकघराच्या पाठच्या दारातून बाहेर पाहिले.

सांज दिवसाच्या कडाकडांनी गूढ, गर्द होत जाणारी, आणि ओघळणाऱ्या पाऊसथेंबांबरोबर निशेची पानं झाडामाडांतून जमीनभर टपटपणारी.

माईंनी चुल्यात लाकडं कोंडली. बाटलीतून रॉकेलच्या अभिषेकाची निसटती धार धरली. गुलाच्या एकाच काडीत अग्नी धगधगावा, म्हणून आटापिटा केला. डोळ्यांतून झोंबरे झरे खळखळले. स्वयंपाकघरभर धूर धुमसला. खोलवर फुंकताना देहातून प्राणाचाही फसकन निचरा होऊन फुंकणीतून ज्वाळांवर पडेल की काय, ही क्षणभर भ्रांत झाली. तसं झालं, तर बरं, असंही वाटून गेलं.

प्राणाची किंमत ही एवढीच. कार्यकारणही नाममात्र. छाती हलकी, पोकळ करण्यासाठी हे व्रत अविरत, अखंडपणे चालावं, चालवावं लागावं, याकरिता एका निर्बळशा धाग्याने या क्षीणावलेल्या जड देहांत चिवटपणे गुंतून राहिला आहे. साडेतीन हात देहाला तगवून ठेवणारा तो प्राण केवढा? अंगठ्याएवढा? ...अंगठ्याएवढा, पण अदृश्य.

'अंगुष्ठमात्र पुरुषाप्रती...'

पुढे?

'तै हाय हाय म्हणती...'

आणखी?

'सप्तपदे सहवासे सख्य साधूशी घडते.'

माई चुलीपाशी क्षणभर बसून राहिल्या. स्मृतिवनात भिरभिरल्या.

पण सारेच तुटक. अर्धवट. काहीच धड आठवेना. संदर्भ सापडेना.

कोणाची कवनं ही? सावित्री- आख्यानातली? माहेरी नाना अंघोळीनंतर म्हणायचे. त्याला किती तपं उलटून गेली. यमाने सत्यवानाचा प्राण नेला, सावित्री त्याच्या मागून धडपडत गेली, त्यातलं हे प्राणाचं परिमाण, अंगुष्ठमात्र.

माळ्यावर कुठेसं वटवाघूळ फडफडलं. 'चीऽऽऽ' 'चीऽऽऽ' चीत्कारलं. वेड्यावाकड्या घिरट्या घालून पुन्हा लुप्त झालं.

चूल धगधगून फुलली.

माईंनी तपेल्यात भाताचं आधण ठेवलं. चुल्याने विस्फारलेल्या प्रकाशडोळ्यांत सावलीची पापणी फडफडली. पुन्हा फडफडली. आणखी पुन्हा.

माई निरखून पाहू लागल्या.

सावली झुलली. मागे-पुढे.

मग उठल्या. पाठच्या पडवीशी चोरपावलांनी आल्या.

वत्सला झोपाळ्यावर बसली होती. हरवून गेल्यासारखी.

माई थांबल्या. कान तीक्ष्ण केले.

''सरसर गोविंदा येतो,

मजवरि गुलाल फेकीतो...

या या गुल्लालाने लाऽऽऽल,

अमुच्या वेण्या झाल्या लाल...''

माई तिरमिरल्या. झोपाळ्याच्या कड्या घट्ट पकडल्या. झोपाळा वाकडातिकडा झाला.

''नतद्रष्ट मेली. ही नाचरी गाणी म्हणत्येस? देवापुढे दिवेलागणी झाली. पाय धुतलेस? पुढलं आटोपलंस?'' माईंनी रागाने विचारलं. वत्सलेच्या पाठीत धपाटा घातला.

वत्सला लडखडत उठली. द्रोणीपाशी गेली.

माई स्वयंपाकघरात आल्या. चुलीशी बसून राहिल्या.

वत्सला देवांपुढ्यात उभी राहिली. म्हणू लागली,

''दिव्या, दिव्या, दीपोत्कार ।

कानि कुंडले मोतीहार ।।''

माई तिला पाहत राहिल्या. पाठमोरी.

दैव पाठीमागूनच येतं, म्हणतात. पाठीमागून येतं आणि अलगद झडप घालतं. घालतं, तेव्हा वर्तमानाचं भान राहत नाही. भविष्याचा वेध घेता येत नाही. दैवाच्या रेट्याने रेटलं जायचं, एवढंच. याचंच नाव 'अगतिकता.' हिच्या पानात काय मांडून ठेवलं आहे, देव जाणे? माईंना वाटलं.

भाताला चांगलेच कढ फुटले होते. पाणी खदखदत होतं.

निशेच्या गूढ मैफिलीत रातकिडे आर्त अंधारगाणी गाऊ लागले, 'किर्रऽऽ... किर्रऽऽ...!' मध्येच चिचुंद्रीचा चुकचुकाट. भिंतींच्या कडांनी अंधारभ्रमंती.

''ये, बायो, ये. शुक्रवारची लक्ष्मी तू...'' माई पुटपुटल्या.

वत्सला तालात रामरक्षा म्हणू लागली.

''रामो राजमणि: सदा विजयते ।
रामं रमेशं भजे ।।''

माईंनी पाटपाणी घेतलं. आखांशी हात लावून पुढ्यात बसल्या.

वत्सलाची रामरक्षा झाल्यावर म्हणाल्या,

''तिकडे बोलाव, गो... पान वाढलंय, म्हणावे.''

वत्सलाने सांगण्याआधी अप्पांना निरोप मिळाला. त्यांनी खोल जांभई दिली. तोंडापुढे टिचक्या मारल्या. माच्यावर उठून बसताना म्हणाले,

''वच्छे, आत विचार, मेजवानीचा बेत काय?''

''भात आणि हरभरे,'' माई म्हणाल्या.

''खोतांकडल्या घुगऱ्या दिसताय्त. कोण प्रसवले? आणि कितवे?'' किळसवाणे हसून नानांनी विचारलं.

''खोतांकडले गाढव प्रसवले; पण त्याचं तुम्हास काय? सोईर संपून बारशाची पंगत असो, वा सुतक संपून तेरावं मांडलेलं असो. तुमची क्षुधाशांती झाल्यास कारण.''

''त्याच स्थितीस म्हणावं 'स्थितप्रज्ञता.' त्यासाठी योगाचरणे नकोत की जपतप नकोत. आम्हांस आयुष्यभर ते आजवर जमले. सहजभावासारखे.''

''हयातभर तेवढेच फक्त जमले,'' माई म्हणाल्या.

अप्पा कान कोरत आत आले. पाटावर बसले. पान उचललं. हरभऱ्याची उसळ हुंगली. तुच्छतेने नाक गदागदा हलवलं. म्हणाले,

''लसूण लावलेली नाही?''

''चातुर्मासाचे विधिनिषेध केव्हाच सुटले. निदान श्रावणाची कदर राखा.''

नाना भरभरून जेवू लागले.

वत्सला भराभर जेवली. पान उचललं. मोरीपाशी ठेवलं. ओटीकडे जाऊ

लागली.

माईंनी थांबवलं. कडाडल्या,

''कधी वळण लागायचं? शेणगोळ्याची किळस वाटते, म्हणून खरकटी काढण्याआधी सूंबाल्या करायचा. आता ताटलीही दुसऱ्याने घासण्याइतकी बाजीरावीण झालीस, वाटते?''

वत्सला माघारी वळली. मोरीपाशी ताटली घासू लागली. उभ्यानेच. भांडं विसळलं. पळाली. ओटीवरच्या चिमणीपुढे पाटी उघडून बसली.

अप्पांनी पहिला भात संपवून पाठचा घेतला.

माईंनी पातेल्याच्या तळाशी डावेचा खडखडाट केला. तिकडे दुर्लक्ष करून अप्पांनी उसळ मागितली. कळ्हणाचा आरपार भुरका मारला.

''आज हळदीकुंकवात बायका काय म्हणत होत्या, ठाऊक आहे?''

''हं?''

''ठाऊक आहे का?''

''वच्छीचेच ना?''

''कसं नेमकं ठाऊक, बाई?''

''पालगडाहून तिच्या बापसाचं मागल्याच हप्त्यांत पत्र आलं होतं.''

''मस वर्दी मिळाली नाही ती?''

''तुमचा विषय नव्हता तो. त्यांनी वच्छीच्या लग्नाचं विचारलं. मी 'वाजवून टाका' कळविलं.''


''कुठला, कुणाचा मुलगा?''

''तुम्हास कशास नसत्या पंचायती? तिचा बाप ठरविणार, त्यात आडकाठी करणारे आपण कोण?''

''का? चार मैन्यांच्या त्या किड्याला पैलं गोदूने पदरात घेतलं. पुढे वर्सापासून आपण पोसलं, ते आजवर. आपला काहीच संबंध येत नाही?'' माईंनी काकुळतीने विचारलं.

◆

# अभिप्राय




## अश्रू

**वि. स. खांडेकर**

किंमत : ३४०/-
पृष्ठे : २५६

अश्रू, प्रत्येक माणसाच्या आयुष्यातले दोन थेंब. ते दु:खाचे असतील तर पचवणं विषाहुनही कठीण. आणि आंनदाचे असतील तर अमृताहुनही गोड. कधी कधी कितीही लपवण्याचा प्रयत्न केला, तरी खळ्कन फुटतात डोळ्यांतून काच तडकल्यासारखे. सामान्य माणसाच्या अश्रूंची किंमत फारशी कुणाला कळत नाही. त्यांची दु:ख श्रीमंतासाठी खूप क्षुल्लक असतात. छोट्या छोट्या गोष्टी मिळवण्यासाठी चाललेली धडपड कधी कधी माणसाच्या

स्वाभिमानाला ठेच पोहोचवते. विं. स. खांडेकरांच्या लेखणीतून जन्माला आलेला सामान्य माणूस ‘अश्रू’ या त्यांच्या कादंबरीत आपल्याला भेटतो. १९५४साली प्रकाशित झालेली ही कादंबरी आजच्या जगातही आपल्यासारख्या सामान्य माणसाच्या मनाला चटका लावून जाते; कारण जे त्यात जे लिहिलंय तेच तर आपण जगत असतो किंवा यापूर्वी जगलेले असतो.

आपल्या मुलाला एक नवीकोरी सायकल, लंकेची पार्वती असलेल्या, नेहमी सुख-दु:खात वाटेकरी असलेल्या बायकोला तिच्या आवडीची साडी आणि वयात आलेल्या, प्रेमात पडलेल्या बहिणीचं तिला हव्या असलेल्या मुलाशी लग्न अशी स्वप्न उराशी बाळगणारा- या कथेतला नायक शंकर एक सरळ साधा नाकासमोर चालणारा शिक्षक. आपल्या दिगंबर नावाच्या जीवलग; पण जुगारी मित्राकडे केवळ शंभर रुपयांची मागणी करतो. पण ते मागतानाही त्याचा स्वाभिमान दुखावतो. त्याच्याकडून तर ते मिळत नाहीतच; पण पापासाहेब नावाच्या एका गर्भश्रीमंत व्यापाऱ्याच्या अगाऊ आणि लहरी कुमुद या मुलीची शिकवणी त्याला मिळते. डोळ्यांच्या तक्रारी असतानाही फक्त तीस रुपयांसाठी आणि आपल्या क्षुल्लक गरजा भागवण्यासाठी तो ती स्वीकारतो. कुमुदच्या वाढदिवसाला तो आपल्या मुलाला चंदूला त्यांच्या घरी घेऊन जातो तेव्हा भिंतीवर काढलेलं तिचाकी सायकलचं चित्र आणि त्यावर बसलेली लहानगी कुमुद पाहून चंदू क्षणभर त्या चित्राभोवती रेंगाळतो. पापासाहेबांच्या नजरेतून ते रेंगाळणं सुटत नाही. Every man has his price असं म्हणत आपल्या नोकराला सांगून ते चंदूला नवीन सायकल भेट देतात. काही माणसं भेटवस्तू देतात ते फक्त समोरच्याला स्वत:च्या उपकाराच्या ओझ्याखाली दाबून ठेवण्यासाठी. केवळ स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी. त्यामुळे वेळीच ‘नाही’ म्हणायला शिकणं खूप गरजेचं असतं. मॅट्रिकच्या पूर्व परीक्षेत कुमुद नापास होते, तेव्हा पापासाहेब शंकरच्या घरी येतात. ‘प्रत्येक पेपरचे शंभर रुपये देईन; पण कुमुदला परीक्षेचा फॉर्म मिळाला पाहिजे’ असं सांगतात. शंकर स्पष्टपणे नकार देतो. तेव्हा ते पाचशे रुपयांची लालूच

दाखवतात. शंकरला खूप संताप येतो. त्यातूनही तो शांत राहण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा, ''कुणाची भूक लहान असते, कुणाची मोठी असते. Every man has his price'' असं म्हणून ते दोन हजार रुपये देऊ करतात. खरंतर पाच हजार रुपयांची मागणी करून तो आपल्या लाडक्या बहिणीचं लग्न तिचं प्रेम असलेल्या कुबेर वकिलांच्या एकुलत्या एक मुलाशी सहज करू शकला असता. पापासाहेबांनाही आपल्या मुलीसाठी तेवढे पैसे खर्च करणं काही कठीण नव्हतं; पण शंकर गरीब असला तरी स्वाभिमानी होता. भिकेच्या पोळीपेक्षा कष्टाची भाकरी गोड मानून खाणारा होता. पापासाहेबांच्या या वागण्याने आता मात्र त्याचा संताप अनावर होतो. तो त्यांना घरातून हाकलून देतो, तेव्हा पापासाहेब चंदूला दिलेल्या नव्या सायकलबद्दल कृतघ्न म्हणूWत्यांना घेऊन जायला सांगतो. ते सायकल घेऊन गेल्यानंतर आपल्या मुलाचा एकुलता एक आनंद हिरावून घेतल्याच्या भावनेने तो चंदूकडे पाहतो. ''दादा, मला सायकल नको. मी सायकलीसाठी कध्धी हट्ट करणार नाही'' असं म्हणत चंदू त्याला बिलगतो.

पापासाहेब नुकतेच नगराध्यक्ष झालेले असतात. पुढे-मागे शाळेला देणगी देतील अशा धोरणाने कमिटी त्यांच्या मुलीचे मार्क्स वाढवून तिला फॉर्म देते. शंकरला जेव्हा हे कळतं तेव्हा त्याला खूप वाईट वाटतं आणि तो नोकरीचा राजीनामा द्यायचा निर्णय घेतो. बहिणीच्या लग्नासाठी पाच हजार रुपये कमवायला तुला जड आहे असं म्हणून त्याची सावत्र आई त्याला बोल लावते; पण गरिबांच्या मुलींनी प्रेमही तोलूनमापून करावं. ''त्याचे वडील लग्न म्हणजे बाजारातला एक सौदा मानतात. या बाजारात उभं राहण्याची माझी इच्छा नाही. झाली एवढी प्रेमाची परवड पुरे झाली.'' हा विचार करून ती बहीण आपल्या भावासाठी आपल्या प्रेमाला तिलांजली देते.

सामान्य मध्यमवर्गीय माणसाचं जगणं याहून निराळं ते काय असतं? आपल्याला हव्या असलेल्या गोष्टींच्या मागे ऊर फुटेपर्यंत धावणं. कित्येकदा पडणं, परत उठून उभं राहणं आणि प्रामाणिकपणा कुठेही

गहाण न ठेवता जगत राहणं. खांडेकरांच्या कल्पनेतला हा शंकर कदाचित एखाद्या प्रॅक्टिकल विचार करणाऱ्या वाचकाला दुबळा, व्यवहारशून्य किंवा तत्त्वांना कवटाळत बसणारा दुर्दैवी शिक्षक वाटेल; पण त्याच्यातलं ध्येयवेडेपण काही जणांनाच उमगेल. पापासाहेबांच्या मुलीचे मार्क वाढवून तो स्वत:चा स्वभिमान विकत नाही; पण अपर्णासारख्या बालविधवेला तो शिक्षणासाठी मदत करतो. झोपडपट्टीत राहणाऱ्या गरजू विद्यार्थ्यास परीक्षेला बसता यावं यासाठी स्वत:च्या खिशाला कात्री लावतो. त्याच्या हाताखालून गेलेल्या वीज कचेरीत कामाला असलेल्या विद्यार्थ्यांकडून तो बील भरलं नाही म्हणून वीज कापू नये, आणखी थोडी मुदत द्यावी एवढीच माफक अपेक्षा करतो. पुस्तकांच्या पलीकडे जाऊन आपल्याकडे जे जे आहे ते आपल्या विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करतो. तुटपुंज्या पगारात संसाराचा गाडा रेटतो आणि मध्यमवर्गीय समाजाचं प्रतिनिधित्व करतो. अशा या सामान्य माणसाच्या अश्रूंची किंमत ती कितीशी असणार??

**- सौ. सीमा सोनावले**

◆

## १६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२५ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन**

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६६५ /- । सवलत किंमत ४९२/-**

**१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन**

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४६९/-**

**१७ सप्टेंबर-अनंत पै यांचा जन्मदिन**

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतींचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ५००/- । सवलत किंमत ३७९/-**

**१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्राँग यांचा जन्मदिन**

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन**

'चित्रमय बोधकथा भाग-१ (दोन पुस्तकांचा संच)', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १२०/- । सवलत किंमत ९०/-**

'एकलव्य' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**१९ सप्टेंबर - माइल्स टेलर यांचा जन्मदिन**

'सम्राज्ञी : महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८७/-**

**२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन**

'नीलकंठ', 'प्लँचेट', 'तळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९४/-**

**२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन**

'सिक्स मशिन' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन**

'ज्ञानदा निबंधमाला' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-**

**२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन**

'A to Z विज्ञान', 'छंदातून विज्ञान', 'फक्त खेळण्यांसाठी', 'खेळणी विज्ञानाची', 'खेळणीच खेळणी', 'प्रयोग वनस्पती विज्ञानाचे', 'साधी यंत्रे', 'वाचनातून विज्ञान', 'वैज्ञानिक खेळणी', 'विज्ञानातील गमतीजमती', 'विज्ञानातील रंजकता', 'छोट्यांसाठी हवा, पाणी आणि प्रकाशाचे प्रयोग', 'छोट्यांसाठी चुंबक, विद्युत आणि ध्वनीचे प्रयोग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १९००/- । सवलत किंमत ११४०/-**

**२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन**

'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'जॅपनीज मॅग्नोलिया', 'मी एरिक', 'आवा मारू-टायटॅनिक ऑफ जपान', 'अ नोट फ्रॉम इचियो', 'वादळफूल', 'मदाम बटरफ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १७७०/- । सवलत किंमत ११९९/-**

**२६ सप्टेंबर- दिलिप दोंदे यांचा जन्मदिन**

'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन**

‘चित्रमय रंगतदार कथा, भाग-१३’, ‘जादूचं रबर आणि इतर गोष्टी, ‘पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी’, ‘जंगल जंमत मालिका भाग -२’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ४२६/-**

**२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन**

‘चला जाणून घेऊ या! हार्ट ॲटॅक’, ‘हृदयविकार निवारण’, ‘हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र’, ‘चला जाणून घेऊ या! ध्यानसाधना’, ‘चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७७०/-। सवलत किंमत ४२७/-**

**३० सप्टेंबर-एली वायझल यांचा जन्मदिन**

‘नाइट’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-**

**३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन**

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३५ टक्के सवलत.

**(किमान खरेदी १०००रु.)**

**खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘संवादु अनुवादु’, ‘केतकरवहिनी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५१६/-**

**१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन**

‘फॉर हिअर, ऑर टू गो?’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**१ ऑक्टोबर - डॉ. व्ही. अरविंद यांचा जन्मदिन**

‘दृष्टिदाता’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५३/-**

**२ ऑक्टोबर - गांधी जयंती**

‘दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी’, ‘महात्मा गांधी आणि तीन माकडे’, ‘मोहनदास’, ‘फ्रिडम ॲट मिडनाइट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७५५/- । सवलत किंमत १०९५/-**

**३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन**

‘द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-**

**८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन**

‘आहे कट्टर तरी...’, ‘तेच दिन सोनेरी...’, ‘झुबेदा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ८४९/-**

**९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन**

‘आघाडीचे महिला नेतृत्व’, ‘दिव्यगुणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४५/-**

**१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन**

‘हलवाई’, ‘वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३४९/-**

**१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन**

‘आंधळी’, ‘आंधळ्याचे डोळे’, ‘अनोळख’, ‘अनुबंध’, ‘चौघीजणी’, ‘गवती समुद्र’, ‘गोंदण’, ‘कविता स्मरणातल्या’, ‘किनारे मनाचे’, ‘लेखक आणि लेखने’, ‘मेघदूत’, ‘निमित्तानिमित्ताने...’, ‘पावसाआधीचा पाऊस’, ‘पूर्वसंध्या’, ‘रंगरेषा’, ‘रेशीमरेघा’, ‘सांगावेसे वाटले म्हणून’,

‘संस्मरणे’, ‘सुवर्णमुद्रा’, ‘वर्षा’, ‘त्रिवेणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४४०५/- । सवलत किंमत ३३६६/-**

**१२ ऑक्टोबर-प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन**
‘टाईमपास’ या पुस्तकावर विशेष सवलत.
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

**१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन**
‘विज्ञान गमती’, ‘विज्ञान जमती’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४४/-**


**१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती**
‘अदम्य जिद्द’, ‘माझी जीवनयात्रा...’, ‘टर्निंग पॉइंट्स’, ‘योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५१०/-**

**१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन**
‘ओमेर्ता’, ‘द लास्ट डॉन’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.
संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ४४९/-

♦


**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**
website : www.mehtapublishinghouse.com
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**
author@mehtapublishinghouse.com


जिथे शब्द संपतात,
तिथे रुश्दींची कहाणी
सुरू होते...
सलमान रुश्दी
नाइफ
नाइफ
एक प्रेरणादायी
लढ्याची साक्ष !
लेखक : सलमान रुश्दी
अनुवाद : उत्पल व. बा.
ebook available

**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/09/2025 Posting Date : 11/09/2025

## आवर्जून वाचावं













## मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________